




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०४० | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com





# भाजप सोडून कोणत्याही पक्षासोबत युती करा

## प्रकाश आंबेडकरांच्या जिल्हाध्यक्षांना सूचना; ठाकरे बंधूंच्या युतीवरही दिली प्रतिक्रिया

मुंबई : (समर्थ गांवकरी)

राज्यात महापालिका निवडणुकीचे बिगुल वाजले असून मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी अधिकृतरित्या युतीची घोषणा केल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या ऐतिहासिक घडामोडीनंतर वंचित बहुजन आघाडीनेही आपली रणनीती स्पष्ट केली असून, पक्षाचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी भाजप सोडून कोणत्याही पक्षासोबत युती करण्याच्या सूचना सर्व जिल्हाध्यक्षांना दिल्या आहेत. राज आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्याचे स्वागत करतानाच, ही एक चांगली गोष्ट असल्याचेही प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी वंचित बहुजन आघाडीची दिशा स्पष्ट केली आहे. ते म्हणाले, भाजप सोडून कोणासोबतही युती करा, दोन्ही राष्ट्रवादी, दोन्ही शिवसेना आणि काँग्रेस बरोबर युती केली तर चालेल, अशा सूचना आंबेडकरांनी जिल्हाध्यक्षांना दिल्या आहेत.

पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, या सगळ्यात महत्त्वाचा भाग म्हणजे भाजप काही ठिकाणी त्यांच्या मित्रांबरोबर चालली आहे, तर काही ठिकाणी युती करणार नाही. काँग्रेस सुद्धा काही ठिकाणी राष्ट्रवादीसोबत चालली आहे, काही ठिकाणी नाही. तीच परिस्थिती शिवसेनेची आहे. त्यामुळे एक अशी पॉलिसी नाही. ज्या महापालिका आहेत, तिथल्या अध्यक्षांना युतीसंदर्भात अधिकार देण्यात आले आहेत. त्यांनी कोणासोबत युती करता येईल याची चाचपणी करावी. मात्र, यात एकच आहे, भाजपसोबत युती करायची नाही, असे आंबेडकरांनी स्पष्ट केले.

दरम्यान, शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या युतीवर प्रतिक्रिया देताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, या युतीचे स्वागत आहे. ही चांगली गोष्ट



आहे. त्यांच्या निर्णयाचे स्वागत आहे, अशी प्रतिक्रिया आंबेडकरांनी दिली आहे. महापालिकेच्या निवडणुका 15 जानेवारीला होणार असून 16 जानेवारीला मतमोजणी होणार आहे. त्यानुसार आता सगळेच पक्ष कामाला लागल्याचे दिसून येत आहे.

राज्यातील नगरपालिका निवडणुकीनंतर होत असलेल्या महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांसाठी काँग्रेस पक्ष सज्ज असून नगरपालिका निवडणुकाप्रमाणेच या निवडणुकीतही समविचारी पक्षांना सोबत घेण्याची काँग्रेसची भूमिका आहे. महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये काँग्रेस व राष्ट्रीय समाज पक्ष एकत्र लढणार असल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जाहीर केले.

## थोडक्यात...



### थेट निवडलेल्या नगराध्यक्षास सदस्यत्व, मताचाही अधिकार

मुंबई (समर्थ गांवकरी) : नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत थेट निवडून आलेली व्यक्ती नगरसेवक म्हणूनही विजयी झालेली असेल तर तिची दोन्ही पदे कायम राहतील. राज्य मंत्रिमंडळाच्या बुधवारी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. अशा व्यक्तीला अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून मत देण्याचा अधिकार असेल. यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 मध्ये सुधारणा करण्यासाठी अध्यादेश काढला जाईल. एखादी व्यक्ती थेट नगराध्यक्ष म्हणून निवडून आलेली असेल व त्याचवेळी एखाद्या वॉर्डातून ती नगरसेवक म्हणूनही विजयी झाली असेल आणि नगराध्यक्ष म्हणून तिच्यावर अविश्वास प्रस्ताव मंजूर झाला तरी ती नगरसेवक म्हणून कायम राहील. जामखेड नगरपरिषदेत भाजपच्या प्रांजल चिंतामणी या नगराध्यक्षपदी तसेच नगरसेवक म्हणूनही विजयी झाल्या आहेत. या निर्णयामुळे त्या दोन्ही पदांवर कायम राहतील. विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी ही नगरपरिषद जिंकत राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) आ. रोहित पवार यांना धक्का दिला. आजच्या निर्णयात 'जामखेड'ची भूमिका महत्त्वाची असल्याचे म्हटले जात आहे.

# तामिळनाडू हादरलं : कडलूरमध्ये भीषण अपघात

## भरधाव बसने दोन कारना चिरडले, ९ जणांचा मृत्यू



तामिळनाडू : (समर्थ गांवकरी)

तामिळनाडूच्या कडलूर जिल्ह्यात बुधवारी रात्री उशिरा एक काळजाचा थरकाप उडवणारी घटना घडली आहे. तिरुचिरापल्लीहून चेन्नईच्या दिशेने जाणाऱ्या एका सरकारी बसचा टायर अचानक फुटल्याने भीषण अपघात झाला. टायर फुटल्याने चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि ही बस दुभाजक ओलांडून दुसऱ्या लेनमध्ये घुसली. समोरून येणाऱ्या दोन कारना या बसने इतक्या जोरात धडक दिली की, दोन्ही गाड्यांचा अक्षरश: चक्काचूर झाला. या हृदयद्रावक अपघातात ९ प्रवाशांचा मृत्यू झाला असून, ४ जण गंभीर जखमी आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, तामिळनाडू राज्य परिवहन महामंडळाची बस हायवेवरून वेगाने जात होती. अचानक बसचा टायर फुटला आणि क्षणात होत्याचे नव्हते झाले. अनियंत्रित झालेली बस थेट डिव्हायडर तोडून विरुद्ध दिशेच्या लेनमध्ये आली. यावेळी समोरून येणाऱ्या दोन कारना बसने जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दोन्ही कार बसच्या खाली अडकल्या गेल्या. अपघातानंतर परिसरात एकच गोंधळ सुरू झाला. स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. या भीषण अपघातात ७ जणांचा जागीच मृत्यू झाला होता, तर दोघांनी रुग्णालयात उपचारादरम्यान जीव सोडला. मृतांमध्ये ५ पुरुष आणि ४ महिलांचा समावेश आहे. जखमींमध्ये दोन चिमुरड्यांचाही समावेश असून त्यांच्यावर सध्या सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे. अपघाताची माहिती मिळताच तित्ताकुडी आणि रामनाथम पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. क्रेनच्या साहाय्याने बसखाली अडकलेल्या गाड्या बाहेर काढण्यात आल्या.

या अपघातामुळे चेन्नई-तिरुची नॅशनल हायवेवर कित्येक किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर रस्ता मोकळा करण्यात आला आणि वाहतूक पूर्ववत झाली.

या भीषण दुर्घटनेवर तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी मृतांच्या नातेवाईकांप्रती संवेदना प्रकट केल्या असून तातडीने आर्थिक मदतीची घोषणा केली आहे. मृतांच्या वारसांना प्रत्येकी ३ लाख रुपये आणि गंभीर जखमींना १ लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री मदत निधीतून दिली जाणार आहे. तसेच जखमींना सर्वतोपरी वैद्यकीय उपचार पुरवण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

पार्थ पवारांचा जमीन घोटाळा

# सरकारतर्फे पुणे न्यायालयासमोर माहिती सादर

## तेजवानीच्या कोठडीत वाढ, पार्थच्या 'अमेडिया'त भागीदार म्हणून तेजवानीच्या ऑफिस बॉयची सही



पुणे : (समर्थ गांवकरी)

उपमुख्यमंत्री अजित पवारांचे पुत्र पार्थ यांनी १८०० कोटी रुपयांची जमिन ३०० कोटी रुपयात खरेदी केली. या प्रकरणी पार्थ यांना जमीन विकणाऱ्या शीतल तेजवानी नामक महिलेला अटक करण्यात आली आहे. सध्या बावधन पोलिसांच्या ताब्यात असलेल्या तेजवानीला मागील कोठडीची मुदत संपल्यानंतर पौड परिसरातील न्यायालयात हजर करण्यात आले. तिच्याविषयी माहिती देताना सरकारी वकिलांनी पुणे न्यायालयासमोर सांगितले की, तेजवानीसोबत काम करणाऱ्या एका ऑफिस बॉयने पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीचा भागीदार म्हणून महत्त्वाच्या कागदपत्रांवर स्वाक्षरी केली आहे. दरम्यान, तेजवानीची पोलिस कोठडी २७ डिसेंबरपर्यंत वाढवली आहे.

सरकारी पक्षाने न्यायालयाला माहिती दिली की, ऑफिस बॉयने मुंडवा येथील सरकारी जमीन खरेदी करणाऱ्या 'अमेडिया' कंपनीचा भागीदार म्हणून प्रतिज्ञापत्रे आणि प्राधिकारपत्रांसारख्या कागदपत्रांवर स्वाक्षरी केली होती. हा ऑफिस बॉय आणि तेजवानीत काही आर्थिक व्यवहार झाले होते का, हे निश्चित करण्यासाठी पोलिसांना या कागदपत्रांची तपासणी करायची आहे. काही आरटीआय कार्यकर्त्यांनी जमीन व्यवहाराशी संबंधित नवीन कागदपत्रे बावधन पोलीस ठाण्यात सादर केल्यामुळे तपासाची व्याप्ती वाढली आहे.

दरम्यान, कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि विजय कुंभार यांनी पिंपरी चिंचवड पोलिसांना पत्र लिहून, या प्रकरणातील तक्रारदार असलेले सह-जिल्हा निबंधक संतोष हिंगणे यांच्यासोबत पार्थ पवार यांचे नावही एफआयआरमध्ये समाविष्ट करण्याची मागणी केली आहे.

# जागावाटपाचे गुऱ्हाळ सुरूच



## भाजपचा प्रस्ताव शिंदेंना अमान्य, मुंबईचा तिढा कायम

मुंबई : (समर्थ गांवकरी)

उद्धव आणि राज ठाकरे यांनी अखेर बुधवारी युतीची घोषणा केली, मात्र महायुतीचे चर्चेचे गुऱ्हाळ सुरूच आहे. भाजप नेत्यांच्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह त्यांच्या नेत्यांशी चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या पण भाजपने देऊ केलेल्या जागा शिवसेनेला (एकनाथ शिंदे) मान्य नसून त्यांना अधिक जागांची अपेक्षा आहे. त्यामुळे मुंबईसह अन्य ठिकाणी जागावाटपाचा तिढा कायमच आहे. शिवसेनेला अधिक जागा दिल्याचे दाखविण्यासाठी भाजपचे काही उमेदवार त्यांच्याकडे पाठवून उमेदवारी देण्याचा पर्याय ८-१० जागांसाठी सुचविण्यात आला आहे. जागावाटपाचा प्रश्न दोन दिवसांत सुटेल, असे सूत्रांनी सांगितले. मुंबई महापालिकेच्या जागावाटपाची चर्चा गेल्या आठवड्यात सुरू झाली आणि १८० हून अधिक जागांवर एकमत झाल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र भाजप-शिवसेनेकडून अधिकृतपणे जागावाटपाचा तपशील जाहीर करणे टाळण्यात येत आहे. मुंबईत शिवसेनेला १०० हून अधिक जागांची अपेक्षा असून भाजप ७०-७५ हून अधिक जागा देण्यास तयार नाही. गेल्या निवडणुकीत शिवसेनेने जिंकलेल्या ८४ जागाही देण्यास भाजपने नकार दिल्याने शिवसेनेत नाराजी आहे. त्यामुळे जागावाटपाच्या वेळीच महापौर, स्थायी समिती अध्यक्ष पद व अन्य महत्त्वाच्या पदांच्या वाटपाबाबतही शिवसेनेला भाजपकडून आश्वासन हवे असल्याचे समजते. ठाकरे बंधूंची युती झाल्याने भाजपने अधिक सावध भूमिका घेतली आहे. खासगी संस्थांकडून सर्वेक्षण करण्यात आली आहेत. ठाकरे बंधूंच्या युतीचा कोणता व किती परिणाम कोणत्या प्रभागांमध्ये होईल, याची चाचपणी करण्यात आली आहे. त्यादृष्टीने ती जागा कोणाकडे जाईल व युतीचा उमेदवार कोण असेल, हे निश्चित करण्यात येत आहे. भाजप-शिवसेनेत इच्छुकांची संख्या मोठी असून जागावाटप आताच जाहीर केल्यास आणि ती जागा कोणत्या पक्षाकडे किंवा उमेदवाराला मिळेल, हे समजल्यास इच्छुक ठाकरे बंधूंकडे जाण्याची शक्यता आहे. यामुळेही जागावाटपाच्या चर्चेचे गुऱ्हाळ सुरूच आहे. युतीच्या चर्चेचे गुऱ्हाळ सुरू असतानाच भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई आदी महानगरपालिकांबाबत उभयतांमध्ये चर्चा झाल्याचे समजते.




# दादा चौधरी मराठी शाळेचे ७४ वे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न

## जीवनात यशस्वी होण्यासाठी जिद्द, कष्ट आणि मेहनत केलीच पाहिजे : अँड. जयवंत भापकर

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

हिंद सेवा मंडळाने परीश्रम घेऊन चांगल्या पद्धतीने गुणवत्ता असलेली मराठी माध्यमाच्या शाळा चालविले आहेत. दादा चौधरी मराठी शाळेची प्रगती कौतुकास्पद आहे. येथील सर्व शिक्षक आत्मियतेने विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत.

स्पर्धेच्या युगात मराठी शाळेचे अस्तित्व कमी होत चालले आहे. मराठी भाषेत शिक्षणाचा ओढा वाढवावा. यासाठी महाराष्ट्र सरकारने क्रांतिकारक निर्णय घेतलेले आहे. एमबीबीएस व इंजिनिअरिंग चे शिक्षण मराठीतून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.यापुढील काळात मराठी शाळेला चांगले भवितव्य आहे.

स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांचे सुप्त कला गुण बाहेर पडतात. शिक्षण हे महत्त्वाचे आहे. त्यासोबतच विविध कला गुण अवगत करणे व खेळात प्राविण्य मिळविणे हे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे.जीवनात यशस्वी होण्यासाठी जिद्द, कष्ट आणि मेहनत केलीच पाहिजे.

असे प्रतिपादन नगरक्लबचे डायरेक्टर अँड.जयवंत भापकर यांनी केले आहे.

हिंदसेवा मंडळाच्या दादा चौधरी मराठी शाळेचे ७४ वे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगर क्लबचे डायरेक्टर अँड.जयवंत भापकर, प्रमुख उपस्थितीत उद्योजक राजेंद्र शुक्रे, अँड. शैलेंद्र गांधी,जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा,हिंद सेवा मंडळाचे उपाध्यक्ष शरद गोखले,दादा चौधरी मराठी शाळेचे चेअरमन सुमतीलाल कोठारी,पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी, भाई सथ्था रात्र प्रशालाचे चेअरमन प्रा. ज्योती कुलकर्णी,शालेय समिती सदस्य अनंत पाठक, रसिक गांधी, अजय लुंकड, जयकुमार रंगलानी, सौ.सविता तागडे,सौ. माधुरी कुलकर्णी, सेवक प्रतिनिधी विठ्ठल उरमुडे, दादा चौधरी मराठी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष येवले, संदेश पिपाडा,अजय महाजन, शिक्षक प्रतिनिधी दिलीप परसपाटकी,स्नेहसंमेलन प्रमुख सौ.रुपाली वाळुंजकर, पालक प्रतिनिधी श्याम खाकाळ,विद्यार्थी प्रतिनिधी चि.श्रेयस मुठे, विद्यार्थ्यांनी प्रतिनिधी कु.तनुजा सरसे आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

राजेंद्र शुक्रे म्हणाले,शाळेचा माजी विद्यार्थी असल्याने शाळेत आल्यानंतर जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आहे.

विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर न करता मैदानी खेळ खेळावेत.गोष्टींची पुस्तके वाचावी. शिक्षकांनी सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीचे पालन करावे.चांगला अभ्यास करून मोठे व्हावे व शाळेचे नाव उज्वल करावे.

शैलेंद्र गांधी म्हणाले, आई,वडील व शिक्षक जीवनात गुरु असून मार्गदर्शन करत असतात. नाट्यवाचन, वक्तृत्व स्पर्धा,क्रीडा स्पर्धेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन.

प्रास्ताविकात सुमतीलाल कोठारी म्हणाले,विद्यार्थ्यांना मराठी माध्यमातून दर्जेदार व गुणवत्तापूर्वक शिक्षण मिळावे यासाठी हिंद सेवा मंडळ सदैव प्रयत्नशील असते.

दादा चौधरी मराठी शाळेतील डिजिटल क्लासेस,आत्याधुनिक संगणक कक्ष,स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची तयारी, विद्यार्थ्यांसाठी विविध खेळांच्या स्पर्धा,चित्रकला स्पर्धा,विज्ञान प्रदर्शन असा सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आले आहेत.शाळेतील सर्व शिक्षक विद्यार्थ्यांची परीक्षेसाठी चांगली तयारी करून घेतात. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच खेळाकडे लक्ष द्यावे.मुख्याध्यापक सुभाष येवले यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रशांत ठाणगे,मनोज हिरणवाळे,प्रिया आहिरे,सुनिता देवराव,मीनाक्षी गणगले,मंगल पवार,सरस्वती तुम्मा,भारती ढेरे आदींनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली डफळ व शीतल पवार यांनी केले तर आभार सौ.माधुरी कुलकर्णी यांनी मानले.



# "राम कृष्ण हरी" मंत्राचे बीजारोपण करणारी ओतूर ही अध्यात्मिक राजधानी : ह.भ.प. महाराज कदम




पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सर्वप्रथम साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जलशुद्धीकरण प्रकल्प अंदाजे २ कोटी रुपये खर्च करून ४.२५ लाख लिटर प्रति दिवस क्षमता असलेला प्रकल्प उभारला असून याचे लोकार्पण देखील यावेळी करण्यात आले.

**जुन्नर : (समर्थ गांवकरी)**


जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे सद्गुरू बाबाजी चैतन्य महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ओतूर ही भूमी अखंड वारकरी सांप्रदायाला मिळालेल्या "राम कृष्ण हरी" मंत्राचे बीजारोपण करणारी अध्यात्मिक राजधानी असल्याचे मत ह.भ.प.माऊली महाराज कदम (छोटे माऊली) यांनी ओतूर ( ता.जुन्नर) येथे व्यक्त केले.

जगद्गुरू बाबाजी चैतन्य महाराज व संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे सदगुरू - शिष्य भेटीच्या पुर्णाकृती शिल्पाचा भव्य लोकार्पण सोहळा बुधवारी (दि.२४) ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज कदम (छोटे माऊली) ह.भ.प.गुरूवर्य तुळशिराम महाराज सरकटे यांच्या शुभहस्ते जुने बस स्थानक ओतूर (ता.जुन्नर) येथे संपन्न झाला.यावेळी ते बोलत होते.

पुढील पिढीला स्मरण राहण्यासाठी या शिल्पाचे उभारीकरण झालं असून,या शिल्पाचा अनावरण सोहळा संपन्न झाला असल्याने ह.भ.प.माऊली महाराज कदम यांनी समाधान व्यक्त केले.तर प्रास्ताविक करताना ह.भ.प.गंगाराम महाराज डुंबरे यांनी सांगितले ओतूर येथे त्रिशकोत्तर सोहळा संपन्न झाला.अनुग्रहाचे एक शिल्प या ऐतिहासिक भूमीत उभे रहावे या करीता सरपंच डॉ.छायाताई तांबे व ग्रामपंचायत सदस्य ग्रामस्थांच्या सहकार्याने उभे करून धर्मध्वजाची देखील उभारणी करण्यात आली याकरिता सहा महिन्याचा कालावधी लागला. यासाठी अनेक जणांनी सर्वोतोपरी मदत केली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ओतूरच्या सरपंच डॉ.छाया तांबे यावेळी बोलताना म्हणाल्या की, ह.भ.प.माऊली महाराज कदम (छोटे माऊली ) यांच्या नेतृत्वाखाली त्रिशतकोत्तर वैकुंठगमन सप्ताह सोहळा ओतूर येथे संपन्न झाला.या सप्ताहावेळी ज्यांनी अवघ्या वारकरी संप्रदायाला "राम कृष्ण हरी" मंत्र दिला. त्या चैतन्य महाराज व श्री संत तुकाराम महाराजांच्या महाराजांच्या अनुग्रहाचे शिल्प या भूमीत व्हावे यासाठी माऊली महाराज कदम यांची प्रेरणा घेऊन,येथील जुन्या स्टँडवर शिल्प उभारून,ओतूरच्या वैभवात भर टाकणारा क्षण ओतूरकर यांनी अनुभवला.या गुरू शिष्य भेटीच्या पूर्णाकृती शिल्पांचा भव्य लोकार्पण ह.भ.प.माऊली महाराज कदम (छोटे माऊली) व ह.भ.प.तुळशीराम महाराज सरकटे यांच्या हस्ते संपन्न झाला.

# निस्सीम देशभक्त, भारतरत्न, कवी मनाचे एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्व : अटलजी

**(समर्थ गांवकरी)**



-: शब्दांकन :-
**श्री. भाऊसाहेब वाकचौरे पाटील**
**जिल्हा संयोजक, भाजपा, सोशल मीडिया सेल, उत्तर नगर जिल्हा**

"सत्ता का खेल चलेगा,
सरकारें आएंगी, जाएंगी,
पार्टियां बनेंगी, बिगड़ेंगी मगर
ये देश रहना चाहिए ।"_

असे देशाप्रती भावना असणारे कवी मनाचे देशाचे पंतप्रधान, भारतीय जनता पार्टी चे संस्थापक अटलबिहारी वाजपेयी यांचा जन्म 25 डिसेंबर 1924 रोजी झाला. त्यांचे हे जन्मशताब्दी वर्ष असून सरकारच्या वतीने "सुशासन दिन" म्हणून पाळला जातो.

भारतरत्न श्री अटलबिहारी वाजपेयी हे एक "प्रतिष्ठित तत्वज्ञानी", एक राजकारणी होते ज्यांनी आपल्या बुद्धिमत्तेने, दूरदृष्टीने आणि सचोटीने भारताचे भाग्य घडवले. त्यांचे अद्वितीय व्यक्तिमत्व, वक्तृत्व, कर्तृत्व आणि मैत्रित्व यांनी त्यांच्या नेतृत्वाची व्याख्या केली. त्यांचा वारसा येणाऱ्या पिढ्यांसाठी नेहमीच जपला जाईल.

श्री अटलबिहारी वाजपेयी हे एक प्रतिष्ठित आणि महान व्यक्तिमत्त्वाचे नेते होते, त्यांची राजकीय कारकीर्द 1942 च्या 'छोडो भारत' आंदोलनापासून सुरू झाली, जेव्हा त्यांना 24 दिवस तुरुंगात काढावे लागले. त्यावेळी त्यांची भेट शामाप्रसाद मुखर्जी यांचे सोबत झाली. त्यामुळे ते जनसंघाचे सदस्य झाले. राष्ट्रीय अध्यक्ष झाले. तसेच श्री अटलबिहारी वाजपेयी हे भाजपचे संस्थापक अध्यक्ष होते.

श्री अटलबिहारी वाजपेयी यांचे जीवन भारतीय लोकशाही, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक समरसतेसाठी समर्पित होते, त्यांनी 'राष्ट्रधर्म', 'पांचजन्य' आणि 'वीर अर्जुन' यासारख्या राष्ट्रीय प्रेरीत वृत्तपत्रांचे संपादन करून राष्ट्रवादी विचारसरणीचा प्रसार केला होता. श्री अटलबिहारी वाजपेयी यांना 1975 मध्ये माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लागू केलेल्या आणीबाणीच्या वेळी अटक करण्यात आली होती.

त्यांच्या वक्तृत्व, दूरदृष्टी आणि लोकप्रियतेमुळे ते तीन वेळा देशाचे पंतप्रधान झाले. अटलबिहारी वाजपेयी यांनी 24 पक्षांच्या युतीसह सरकार स्थापन केले, एवढी मोठी आघाडी असूनही त्यांच्या सरकारमध्ये कोणत्याही पक्षाने कधीही वाद निर्माण केला नाही. हे त्यांच्या नेतृत्व क्षमतेचे उत्कृष्ट उदाहरण होते.

जेव्हा अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार 1999 मध्ये लोकसभेत केवळ एका मताने पडले तेव्हा त्यांनी त्यांची "हार नही मानुंगा, रर नही ठनूंगा" ही कविता वाचली. या कवितेतून त्यांचा आत्मविश्वास, दृढनिश्चय आणि सकारात्मक दृष्टीकोन दिसून आला, जो आजही प्रेरणास्त्रोत आहे. अटलजी हे एक प्रतिष्ठित नेते, कुशाग्र राजकारणी, निस्वार्थी समाजसेवक, शक्तिशाली वक्ते, कवी, साहित्यिक, पत्रकार आणि बहुआयामी प्रतिभा असलेली व्यक्ती होती.एक हिंदी कवी आणि लेखक देखील होते. संघाने स्वसंवर्धन आणि शिस्तबद्ध राष्ट्रनिर्मितीवर भर दिल्याने वाजपेयींच्या सुरुवातीच्या जागतिक दृष्टिकोनावर कायमचा ठसा उमटला. विद्वानांनी असे निरीक्षण नोंदवले आहे की वाजपेयींनी सांस्कृतिक राष्ट्रवादाला राजकीय संयमाशी जोडले, ज्यामुळे स्वातंत्र्योत्तर भारतीय रूढीवादाचा एक विशिष्ट भाग सभ्यतेच्या अस्मितेमध्ये रुजला होता. त्यांची भाषणे आणि कविता भारताच्या सांस्कृतिक आणि तात्विक परंपरेतून काढलेल्या विषयांसह राजकीय व्यावहारिकतेचे मिश्रण करण्यासाठी प्रसिद्ध आहेत.

**श्री अटलबिहारी वाजपेयी राष्ट्र उभारणीला समर्पित**

अटलजींच्या सरकारने अन्नपूर्णा अन्न योजना सुरू केली, ज्याने समाजातील सर्वात गरीब घटकाची अन्न सुरक्षा सुनिश्चित केली आणि भूकमुक्त भारत निर्माण केला. अटलजी यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. या मंत्रालयाच्या स्थापनेमुळे आदिवासी समाजाच्या विकासाचे काम पद्धतशीरपणे केले जात आहे. कावेरी पाणी वाटप तंटा त्यांनी सोडवला.

श्री अटलजी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या किसान क्रेडिट कार्ड योजनेने शेतकऱ्यांना संस्थात्मकरित्या कर्ज दिले, जेणेकरून शेतकऱ्यांना त्यांची शेतजमीन मालकाकडे गहाण ठेवावी लागू नये. साखर उद्योग (1998), दुग्ध उद्योग (2002) यांना परवाना देण्याबरोबरच 2002 मध्ये बीटी कापसाला परवानगी देऊन कृषी विकासात क्रांतिकारक पावले उचलली.

अटलजींनी छत्तीसगड, उत्तराखंड, झारखंड यासारख्या राज्यांची शांततापूर्ण निर्मिती सुनिश्चित केली, ज्यामुळे या प्रदेशांना केंद्रीकृत शासन आणि प्रादेशिक विकासाची संधी मिळाली.

वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली पोलिओ विरुद्ध यशस्वी मोहीम राबवण्यात आली. अटलजींच्या प्रयत्नांचेच फलित आहे की आज देश पोलिओच्या साथीपासून मुक्त झाला आहे. दिल्ली मेट्रोच्या लाल रेषेचे उद्घाटन वाजपेयी यांच्या हस्ते करण्यात आले, ज्याने भारतातील महत्त्वाच्या शहरी वाहतूक व्यवस्थेची सुरुवात केली. या उपक्रमाने देशात आधुनिकीकरणाचा यशस्वी टप्पा सुरू झाला. अटलबिहारी वाजपेयी यांनी चांद्रयान मिशनची पायाभरणी केली, ज्याने चांद्रयान-1 ची घोषणा करून अवकाश तंत्रज्ञानामध्ये भारताची प्रतिष्ठा जगात वाढवली. अटलबिहारी वाजपेयी यांच्या चीन भेटीदरम्यान पहिल्यांदा सिक्कीमला भारताचा अविभाज्य भाग म्हणून औपचारिकपणे स्वीकारले.

'पोखरण-२' अणुचाचण्या (१९९८): त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने यशस्वी अणुचाचण्या केल्या, ज्यामुळे भारताची सामरिक ताकद वाढली.

'कारगिल युद्ध' (१९९९): त्यांनी पाकिस्तानविरुद्धच्या कारगिल युद्धात देशाला यशस्वी नेतृत्व दिले.

'सोनेरी चतुर्भुज' योजना: देशातील प्रमुख शहरांना जोडणाऱ्या महामार्गांची ही योजना त्यांच्या काळात सुरू झाली.

'प्रधानमंत्री ग्राम सडक योजना' ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासासाठी ही योजना सुरू केली.

'सर्व शिक्षा अभियान': शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी या मोहिमेची सुरुवात केली.

अटल बिहारी वाजपेयी यांचा भारत-पाकिस्तान संबंधांबद्दलचा दृष्टिकोन 'शांती आणि मैत्री' यावर आधारित होता, पण 'गरज पडल्यास कठोर भूमिका' घेण्यास ते तयार होते; त्यांनी लाहोर बस सेवा, कारगिल युद्धानंतरची शांतता चर्चा यांसारख्या पुढाकारांद्वारे संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला, पण दहशतवादाला पाठिंबा दिल्यास 'त्यांच्या भाषेत उत्तर देण्याची' तयारी दर्शवली.वाजपेयींनी नेहमी शांततेचा संदेश दिला. लाहोरला बसने जाऊन त्यांनी पाकिस्तानच्या जनतेला मैत्रीचा हात दिला.दहशतवादाविरुद्ध कठोर भूमिका होती. शांततेची भाषा न समजल्यास उत्तर देण्याची त्यांची भूमिका होती, खासकरून जेव्हा पाकिस्तान दहशतवादाला पाठिंबा देत होता. काश्मीर प्रश्नावर त्यांनी 'मानवता, लोकशाही आणि काश्मीरियत' या तत्त्वांवर तोडगा काढण्यावर भर दिला. त्यांनी पाकिस्तान सोबत संवाद सुरू केला, ज्यात काश्मीरसह अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली आणि पाकिस्तानने दहशतवादाला पाठिंबा न देण्याचे मान्य केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे नोव्हेंबर २००३ मध्ये नियंत्रण रेषेवर शस्त्रसंधी झाली.

थोडक्यात, वाजपेयींचा दृष्टिकोन 'शांतताप्रिय शेजारी म्हणून भारताची प्रतिमा जपण्याचा आणि त्याच वेळी देशाच्या सुरक्षेसाठी कणखर राहण्याचा होता, ज्यामुळे दोन्ही देशांमधील संबंध सुधारतील अशी त्यांची धारणा होती.

भारताच्या विकसित होत असलेल्या सभ्यतेच्या राजकारणाच्या संदर्भात वाजपेयींच्या वारशाची वारंवार चर्चा केली जाते. टीकाकारांचा असा युक्तिवाद आहे की त्यांनी सांस्कृतिक राष्ट्रवादाचे आकर्षण व्यापक केले आणि त्याला सहमतीचे राजकारण, संसदीय शिष्टाचार आणि लोकशाही संस्थांप्रती असलेली बांधिलकी यांचा समावेश केला. त्यांची वक्तृत्वशैली आणि कविता आधुनिक प्रशासनाला सांस्कृतिक आत्म-जागरूकतेशी जोडणाऱ्या भारताच्या दृष्टिकोनाचे अभिव्यक्ती म्हणून उद्धृत केल्या जातात. त्यांच्या कार्यकाळाचे वर्णन अनेकदा भारतीय सांस्कृतिक ओळखीच्या नंतरच्या राजकीय अभिव्यक्तीसाठी संस्थात्मक पाया घालणारे म्हणून केले जाते, ज्यामुळे ते भारतातील रूढीवादी आणि राष्ट्रवादी विचारांच्या दीर्घकालीन उत्क्रांतीत एक मध्यवर्ती व्यक्तिमत्त्व बनले.

वाजपेयी यांचे नंतरचे चित्रण एक सलोख्याचे किंवा मध्यमार्गी व्यक्तिमत्व म्हणून लेखकांच्या व्याख्यात्मक चौकटी प्रतिबिंबित करते जे त्यांच्या राजकारणाच्या सांस्कृतिक-राष्ट्रवादी मुळांना मान्य करण्यास अस्वस्थ होते. हे चित्रण आरएसएस परंपरेतील त्यांच्या आयुष्यभराच्या वैचारिक संरेखनाच्या कागदोपत्री पुराव्यामध्ये बदल करत नाहीत. वाजपेयींची राजकीय घडण पूर्णपणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) सांस्कृतिक-राष्ट्रवादी परंपरेत होती, ज्यांच्या वैचारिक शब्दसंग्रह आणि संघटनात्मक शिस्तीने किशोरावस्थेपासून त्यांच्या सार्वजनिक जीवनाला आकार दिला. म्हणूनच राष्ट्रीय नेता म्हणून त्यांचा उदय भारतीय राजकारणातील या सांस्कृतिक-राष्ट्रवादी प्रवाहाची परिपक्वता प्रतिबिंबित करतो, त्यापासून दूर जाण्याऐवजी. नंतरच्या टीकाकारांनी या वस्तुस्थितीला वेगवेगळ्या प्रकारे मान्यता दिली आहे किंवा नाकारली आहे - बहुतेकदा त्यांच्या शैलीचा त्यांच्या स्वतःच्या राजकीय चौकटीतून अर्थ लावला आहे - परंतु ऐतिहासिक नोंद त्यांना हिंदू सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या मार्गात सातत्याने स्थान देते.

* एकमेव वाजपेयी जे चार राज्यातून लोकसभेत निवडून गेले
* एकमेव वाजपेयी जे पहिले बिगर काँग्रेस पंतप्रधान ज्यांनी आपला कार्यकाळ पूर्ण केला
* एकमेव वाजपेयी संयुक्त राष्ट्र संघात हिंदीत भाषण करणारे
* एकमेव वाजपेयी ज्यांच्या अंत्ययात्रेत विद्यमान पंतप्रधान सह सर्व मंत्रीमंडळ पायी चालून श्रद्धांजली अर्पण केली

आपल्या विरोधकांना समान आदर देणे हे श्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या सदाचारी लोकशाही मूल्यांचे उदाहरण आहे. पंडित नेहरू यांनी अटलजींना उद्देशून सांगितले होते की, एक दिवस हा देशाचा पंतप्रधान होईल. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी वाजपेयी यांना भारतीय राजकारणाचे 'भीष्म पितामह' म्हटले होते .

त्यांचा पंतप्रधानपदाचा कार्यकाळ इतका गौरवशाली होता की दोन दशकभरानंतरही तो कार्यकाळ केवळ लक्षात राहत नाही तर त्याची अंमलबजावणीही केली जाते.

जवाहरलाल नेहरू व इंदिरा गांधी यांच्या नंतर प्रदीर्घकाळ पंतप्रधान व खासदार राहिलेले वाजपेयी एकमेव आहेत. ते पाहिले पंतप्रधान होते जे बिगर काँग्रेसी कार्यकाळ पूर्ण करणारे.

वाजपेयी हे परराष्ट्र मंत्री म्हणून 1977 मध्ये संयुक्त राष्ट्र संघाला हिंदीत संबोधित करणारे पहिले व्यक्ती होते.

अटलजींची देशावरती खूप प्रेम होते त्यांचं प्रतिबिंब त्यांचे कवितेतून उमटतात

भारत जमीन का टुकड़ा नहीं
जीता जागता राष्ट्रपुरुष है
हिमालय मस्तक है,
कश्मीर किरीट है,
पंजाब और बंगाल दो
विशाल कंधे हैं,
पूर्वी और पश्चिमी घाट
दो विशाल जंघायें हैं,
कन्याकुमारी इसके चरण हैं,
सागर इसके पग पखारता है,
यह चन्दन की भूमि है,
अभिनन्दन की भूमि है,
यह तर्पण की भूमि है,
यह अर्पण की भूमि है*

तर स्वतः चा जीवन परिचय करून देताना

हिन्दू तन-मन, हिन्दू जीवन,
रग-रग हिन्दू मेरा परिचय

म्हणतात

श्री अटलबिहारी वाजपेयीजी हे भारतीय राजकारणातील एक आदर्श नेते होते, त्यांची विचारशीलता, धोरणे आणि कार्यशैली लक्षात घेऊन त्यांना 1992 मध्ये पद्मविभूषण पुरस्कार, 1994 मध्ये भारताचा 'सर्वोत्कृष्ट संसदपटू' आणि 2015 मध्ये भारताचा सर्वोच्च सन्मान "भारतरत्न" ने सन्मानित करण्यात आले.

**अटलजींच्या दूरदृष्टीवर आधारित विकसित भारताचा संकल्प मोदी सरकार**

मोदी सरकार श्री अटलबिहारी वाजपेयी यांचे अंत्योदयाचे स्वप्न एका मिशनच्या रूपात पूर्ण करत आहे. गरीब कल्याण योजनेतून मोफत रेशन, आवास योजनेतून कायमस्वरूपी घरे, स्वच्छ भारत अभियानातून शौचालये, उज्वला योजनेतून गॅस सिलिंडर, जल जीवन मिशनमधून घरांत नळाचे पाणी, आयुष्मान भारत योजनेद्वारे मोफत उपचार आणि जनऔषधी केंद्रांमधून स्वस्त औषधे दिली जात आहेत. जन-धन खाती, मुद्रा कर्ज आणि स्वानिधीकडून रस्त्यावर विक्रेत्यांना कर्ज देऊन त्यांना स्वावलंबी बनवले, त्यांनी रोजगार साधकांकडून रोजगार निर्मिती करणारेही निर्माण केले.

"किमान सरकार, कमाल शासन" या मंत्राचे पालन करून, सरकारी योजनांचे लाभ थेट लोकांच्या खात्यात डीबीटीद्वारे हस्तांतरित केले जात आहेत, ज्यामुळे भ्रष्टाचारमुक्त भारताची निर्मिती होत आहे. अटलजींचे शेतकरी कल्याणाचे उद्दिष्ट पुढे नेत पंतप्रधान किसान सन्मान निधीतून देशातील शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये चा आर्थिक लाभ देत आहेत. शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी प्रथमच सहकार मंत्रालयाची स्थापना करण्यात आली आहे. आजच्या भाजप सरकारने पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादावर हल्ला चढवताना, सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईकच्या माध्यमातून पाकिस्तानला काय धडा विसरला होता याची आठवण करून दिली.

अटलजी म्हणाले होते, "जोपर्यंत महिलांना समान अधिकार मिळत नाहीत, तोपर्यंत आपली लोकशाही अपूर्ण राहील." पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महिलांना नारी शक्ती वंदन कायद्याद्वारे देशातील संसद आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षणाचा अधिकार मिळाला आहे.

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारने स्वावलंबी भारत अभियान सुरू केले स्वदेशी उत्पादनाला प्रोत्साहन दिले जात आहे. परदेशी वस्तूंवरील आपले अवलंबित्व कमी केले आणि स्वदेशी उत्पादनांच्या निर्मितीला प्रोत्साहन दिले. अटल बोगदा, बोगीबील ब्रिज, कोसी रेल ब्रिज, आणि पारादीप रिफायनरी, ज्याचा पाया अटलजींच्या सरकारने घातला होता, मोदी सरकारने पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात भारताच्या उपलब्धींना नवीन उंचीवर नेऊन पूर्ण केले.

१६ ऑगस्ट २०१८ रोजी दीर्घ आजाराने दिल्लीच्या एम्स रूग्णालयात अटलबिहारी वाजपेयी यांचे निधन झाले. एका माजी पंतप्रधानाचे अंत्ययात्रेत विध्यमान पंतप्रधान संपूर्ण मंत्रीमंडळासह पूर्णवेळ पायी सहभागी होण्याचा दुर्लभ योग वाजपेयींच्या भाग्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांनी गुरुप्रती वाहिलेली अनोखी श्रद्धांजली होती.

शेवटी अटलजीन चे मनाला भिडणारे वाक्य म्हणजे

" क्या हार में, क्या जीत में
किंचित नहीं भयभीत मैं कर्तव्य
पथ पर जो भी मिला यह भी सही
वो भी सही वरदान नहीं मांगूगा
हो कुछ पर हार नहीं मानूंगा।"

भारतीय राजकारणाचे अजातशत्रू, ओजस्वी वक्ता, माजी पंतप्रधान आदरणीय अटलबिहारी वाजपेयी जी यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या चरणी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. भारताला अणुऊर्जा राष्ट्र बनवणाऱ्या द्रष्ट्याचे विचार देशाच्या उन्नतीसाठी आपल्या सर्वांना प्रेरणा देत राहतील.

# मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**श्रीगोंदा: (समर्थ गांवकरी)**

दिनांक १९ डिसेंबर २०२५, शुक्रवार रोजी सारोळा सोमवंशी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. हे शिबिर मातोश्री मदनबाई धारीवाल हॉस्पिटल संचलित रुबी हॉल क्लिनिक, प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळगाव पिसा, निंबवी ग्रामपंचायत व सारोळा सोमवंशी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडले.



या शिबिरामध्ये नागरिकांची सामान्य आरोग्य तपासणी, रक्तदाब तपासणी, दंतरोग तपासणी तसेच NCD (Non-Communicable Diseases) स्क्रिनिंग करण्यात आली. रुबी हॉल क्लिनिकच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांना मोफत तपासणी व वैद्यकीय सल्ला देण्यात आला. रुग्णांना आवश्यक ती मोफत औषधे वितरित करण्यात आली. तसेच आयुष्मान भारत कार्ड व वय वंदना कार्ड मोफत काढून देण्यात आली.

यावेळी डॉ. गौरव शिंदे (फॅमिली फिजिशियन) यांनी ॲनिमिया (रक्तक्षय) या आजाराविषयी जनजागृती केली. डॉ. विशाल पानशेंडीकर (जनरल सर्जन) यांनी पोटाचे व इतर विकार याबाबत मार्गदर्शन केले, तर डॉ. भाग्यश्री पानशेंडीकर यांनी महिलांच्या आरोग्याविषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली. तसेच डॉ. दीप्ती पवार (दंतरोग तज्ज्ञ) यांनी दंतआरोग्य तपासणी व सल्ला दिला. या उपक्रमात हॉस्पिटलचे युनिट हेड मायकेल पॉल सर, डॉ. चैतन्य, तसेच इतर वैद्यकीय कर्मचारी सहभागी झाले. प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळगाव पिसा व निंबवी येथील वैद्यकीय अधिकारी व आरोग्यसेवकांनी मोलाचे सहकार्य केले.

या आरोग्य शिबिराचा १०० पेक्षा अधिक नागरिकांनी लाभ घेतला. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी सरपंच उज्वला राहुल आढाव, उपसरपंच संदीप ननवरे, ग्रामपंचायत सदस्य अंजाबापू कवाष्टे, शीतल भाऊसाहेब लोंढे, ग्रामविकास अधिकारी स्वप्निल आंबेटकर, चेअरमन अनिल आढाव, माजी सरपंच वाल्मिक मापारे, युवा नेते सचिनभाऊ कातोरे, संदीप आढाव, नारायण ननवरे, नानाभाऊ आगलावे, मधुकर आढाव, नामदेव सुपेकर, उद्धव आढाव, सोनबा आढाव, सहदेव उदार, भगवान उदार, देवराम उदार (सर), हौशीराम शेळके आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल शेळके सर यांनी केले.

# शुक्रवारपासून खंडोबा (सटी) यात्रोत्सवाचा शुभारंभ!

**डोंगरगाव: (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील आढळा परिसरातील डोंगरगाव येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही खंडोबा (सटी) यात्रोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या यात्रोत्सवास शुक्रवार, दिनांक 26 डिसेंबर 2025 पासून उत्साहात सुरुवात होणार आहे.

शुक्रवारी सकाळी 7.30 वाजता मान्यवरांच्या हस्ते अभिषेक व विधिवत पूजा करण्यात येणार असून सकाळी 8.00 वाजता हनुमान भजनी मंडळाची भजनसेवा होणार आहे.

सायंकाळी 4.00 वाजता मानाच्या काठीची पूजा करून हनुमान मंदिर ते पाऊत्के अशी मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी 6.30 वाजता पाऊत्के पासून खंडोबा मंदिरापर्यंत डी.जे., फटाके व आतषबाजीसह भव्य मिरवणूक होणार आहे. या यात्रोत्सव कार्यक्रमास आमदार



डॉ. किरण लहामटे, जालिंदर वाकचौरे, तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे अभियंता शेळके, उपअभियंता भोये, गटविकास अधिकारी अमर माने, वनविभाग अधिकारी पंकज देवरे, पाणीपुरवठा अधिकारी बिन्नर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

यात्रोत्सवाच्या निमित्ताने रात्री 9.00 वाजता कै. तुकाराम खेडकर सह पांडुरंग मुळे (मांजरवाडीकर) यांच्या लोकनाट्य तमाशा मंडळाचा मोफत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

तसेच शनिवार, दिनांक 27 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 8.30 वाजता भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले असून दुपारी 4.00 वाजता जंगी हंगामा होणार असून हागाम्याचा शेवटच्या कुस्तीसाठी डोंगरगाव केसरी ट्रॉफी देऊन गौरवण्यात येणार आहे.

खंडोबा (सटी) यात्रोत्सवानिमित्त भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवदर्शन व विविध धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामपंचायत, यात्रा कमिटी व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ऑनलाइन स्पर्धेला उस्फूर्त प्रतिसाद

## अनुराधा राजाध्यक्ष यांच्या उपक्रमातून सकारात्मक विचारांचा जागर

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

लेखिका-अभिनेत्री अनुराधा राजाध्यक्ष यांच्या संकल्पनेतून आयोजित मनाच्या श्लोकांवर आधारित ऑनलाइन स्पर्धेचे यंदा तिसरे वर्ष यशस्वीरीत्या पार पडले. भारताच्या कानाकोपऱ्यातील खेड्यापाड्यांपासून विविध राज्यांतील स्पर्धकांसह ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि अमेरिका येथूनही या स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला.



मनाच्या श्लोकांचा आजच्या दैनंदिन जीवनाशी असलेला संबंध समजावून सांगणारे व्हिडिओ अनुराधा राजाध्यक्ष यांच्या यूट्यूब चॅनेलवर प्रसारित होत असून, त्याच आधारावर स्पर्धकांनी स्वतःच्या आयुष्याशी निगडित श्लोक निवडून आपले विचार व्यक्त केले. या उपक्रमात सहा वर्षांपासून ९३ वर्षांपर्यंतच्या स्पर्धकांनी सहभाग घेतला. विशेष बाब म्हणजे ऑटिस्टिक व गतिमंद व्यक्तींनाही स्वतंत्र गटातून सहभागी करून घेण्यात आले; त्यामुळे विविध संस्था, त्यांचे विद्यार्थी-शिक्षक-पालक या उपक्रमाशी जोडले गेले.

मनाच्या श्लोकांचा सोपा अर्थ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचावा आणि सकारात्मक विचारांचा प्रसार व्हावा हा उद्देश साध्य होत असल्याचे समाधान व्यक्त करत अनुराधा राजाध्यक्ष यांनी यंदा जाहीर केलेल्या पारितोषिकांव्यतिरिक्त तब्बल ५३ अतिरिक्त रोख पारितोषिके व १४ सन्मानचिन्हे जाहीर केली. अनेक वृत्तपत्रे, मासिके, सामाजिक संस्था, शाळा-महाविद्यालये व हितचिंतकांच्या पाठबळामुळेच हा उपक्रम सर्वदूर पोहोचल्याची कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली.

स्पर्धेच्या २०२५ च्या निकालांमध्ये विविध वयोगट, खुला गट आणि विशेष गटांतील अनेक स्पर्धकांनी पारितोषिके पटकावली. लोकप्रिय व्हिडिओ या विशेष विभागात नेत्रा तुरे (मुंबई) यांना ३४०२ व्ह्यूजसह रुपये २००० चे रोख पारितोषिक जाहीर झाले. तसेच सर्वाधिक स्पर्धक संस्था म्हणून अंबज्ञ भगवद्गीता वृंद, ठाणे यांना सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे.

# जिल्हा परिषदेच्या मांडेवाडी शाळेत फिरती प्रयोगशाळा

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासला जावा, त्यांनी संशोधनाकडे वळावे विज्ञानाविषयी असलेलं कुतूहल, जिज्ञासा समजून घेता यावे. उच्च शिक्षण ते प्राथमिक शिक्षण यांच्यात दुवा साधला जावा या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व एलजी इलेक्ट्रॉनिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने फिरत्या प्रयोगशाळा ग्रामीण भागात गावोगावच्या शाळांमध्ये जाऊन प्रबोधन करत आहे. अकोले तालुक्याच्या दुर्गम भागात असलेल्या जिल्हा परिषदेच्या मांडेवाडी शाळेत आज फिरती प्रयोगशाळा दाखल झाली. प्रयोगशाळेतील साहित्य पाहून मुले हरखून गेली. द्रवरूप नायट्रोजनचे सजीव व निर्जीव वस्तूंवर होणारे परिणाम, लेविटेशन ट्रेन, सौर ऊर्जेवर चालणारी बोट, सॉल्ट वॉटर बॅटरी, फ्लॅश लाईट यासारखे वैज्ञानिक प्रयोग विद्यापीठ प्रतिनिधींनी सादर केले.

# धरणे आंदोलनाला माजी आमदार दांगट यांचा पाठिंबा

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट यांच्यावतीने अनुसूचित जातीच्या मागासवर्गीय समाजाचे प्रश्न संदर्भात धरणे आंदोलनाला माजी आमदार बाळासाहेब दांगट यांनी पाठिंबा दिला आहे .

याबाबत आमदार शरद सोनवणे , तहसीलदार सुनील शेळके , सार्वजनिक बांधकाम विभाग जुन्नर , पंचायत समिती गटविकास अधिकारी प्रतिक चन्नावार , पोलीस निरीक्षक किरण अवचर यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की , महाराष्ट्र सरकारने जुन्नर तालुक्यातील दोनशे वस्त्यांना रस्ते मंजूर केले पण सार्वजनिक बांधकाम विभाग व पंचायत समिती बांधकाम विभाग यांनी सातत्याने दुर्लक्ष केले आहे .आंबे व इतर ठिकाणी रमाई आवास





योजना अंतर्गत घरे मंजूर आहेत पण पंचायत समिती येथून सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे .

सन १९३९ मध्ये नारायणगाव वारुळवाडी येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर येथील ब्रिटिश कालीन विश्रामगृहात राहिले होते या ठिकाणी स्मारक होणे गरजेचे आहे.

तालुक्यातील वडज धरण जलाशय राजमाता जिजाऊ माँ साहेब , माणिकडोह धरण जलाशय कै. माजी आमदार कृष्णराव मुंढे , पिंपळगाव जोगा धरण जलाशय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर , चिल्हेवाडी धरण जलाशय क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व येडगाव धरण जलाशय माजी आमदार कै. वल्लभ बेनके यांची नाव तातडीने देण्यात यावी. तालुक्यातील दलित वस्ती मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मृती समाज मंदिर उभारणे गरजेचे आहे. अनुसूचित जातीच्या वस्तीगृहाच्या मुलांसाठी तालुकास्तरीय वस्तीगृह बांधणे महत्त्वाचे आहे.

तालुक्यातील साडेतीनशे बौद्ध लेणी यासाठीच शासकीय जमीन उपलब्ध व्हावी. अशा विविध मागण्यांचे धरणे आंदोलनास माजी आमदार बाळासाहेब दांगट यांनी पाठिंबा दिला आहे.

अध्यक्ष पोपट राक्षे , उपाध्यक्ष संभाजी साळवे , उपाध्यक्ष सुरेश खरात , शहराध्यक्ष सोमनाथ शिंदे , युवक अध्यक्ष प्रवीण लोखंडे , बाळू खरात व इतर कार्यकर्ते यांनी धरणे आंदोलन केली .

# ग्रामपंचायत कार्यालय कुंडाणे व येथे पेसा दिन उत्साहात साजरा

■ ग्रामस्वराज्याची जाणीव जागवणारा कार्यक्रम

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

कुंडाणे ओ आदिवासी भागातील स्वशासन, अधिकार आणि लोकसहभाग यांची जाणीव अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने ग्रामपंचायत कार्यालय कुंडाणे व येथे पेसा दिन अत्यंत उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला गावातील सर्व स्तरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.





यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सर्व सन्माननीय सदस्य, पेसा अध्यक्ष, ग्रामविकास अधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, आरोग्य अधिकारी व कर्मचारी, गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला, तरुण उपस्थित होते. गावाच्या भवितव्याशी निगडित असलेल्या पेसा कायद्यावर सखोल चर्चा आणि मार्गदर्शन झाले.

कार्यक्रमात पेसा अध्यक्षांनी तरुणांना उद्देशून प्रभावशाली मार्गदर्शन करताना पेसा कायद्याचा मूळ उद्देश स्पष्ट केला. "पेसा म्हणजे केवळ कायदा नाही, तर आदिवासी समाजाच्या स्वाभिमानाची, स्वशासनाची आणि निर्णयस्वातंत्र्याची हमी आहे," असे सांगत त्यांनी ग्रामसभेचे अधिकार, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील स्थानिक हक्क, परंपरा व संस्कृतीचे जतन, तसेच विकासकामांत लोकसहभागाचे महत्त्व पटवून दिले. आजचा तरुण पेसा समजून घेईल, तेव्हाच उद्याचे गाव सक्षम आणि स्वयंपूर्ण बनेल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनीही पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी झाली तर गावाचा सर्वांगीण विकास शक्य असल्याचे मत व्यक्त केले. ग्रामविकास अधिकारी यांनी शासनाच्या योजनांमध्ये ग्रामसभेची भूमिका अधोरेखित केली, तर शाळेच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्ये रुजवण्याचे आवाहन केले. आरोग्य अधिकारी यांनी ग्रामस्वराज्य आणि आरोग्य सेवांचा परस्पर संबंध स्पष्ट केला.

कार्यक्रमादरम्यान तरुणांनी अनुभवातून पारंपरिक ग्रामव्यवस्थेचे महत्त्व सांगितले, तर पेसा अध्यक्ष नारायण गांगुर्डे व छाय सोनवणे यांनी तरुणांना पेसा कायद्याची माहिती घेऊन गावाच्या विकासासाठी सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला. संपूर्ण कार्यक्रमात ग्रामस्वराज्य, अधिकार, जबाबदारी आणि एकात्मतेची भावना ठळकपणे जाणवत होती.

पेसा दिनाच्या निमित्ताने कुंडाणे व गावात अधिकारांची जाणीव, लोकशाही मूल्ये आणि ग्रामसभेचे महत्त्व नव्याने अधोरेखित झाले. हा कार्यक्रम केवळ एक औपचारिक सोहळा न राहता, गावाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी प्रेरणा देणारा आणि परिवर्तनाची दिशा दाखवणारा ठरला.

# बॅलेकेट व चटई वाटप

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील बरबडा येथील शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे यांच्या डोळस संकल्पनेतून बरबडा येथील ज्या समाजात आपन जन्मलो त्या जन्मात काहीतरी देणे लागतो या डोळस संकल्पनेतून शालेय साहित्य वही पेन कंपास पेटी आज बॅलेकेट व चटई थंडिच्या काळात गोरगरिबांच्या सुखा : दुःखात सहभागी होत या उदार अंतकरणाने काहितरी देण्या लागतो भावनेने बरबडा येथील दलितांच्या वस्तीमध्ये साहित्य वाटप करण्यात आले आहे गंगाधर बडूरे यांच्या संकल्पनेतुन बरबडा सर्कल मधील सर्व जिल्हा परिषद शाळेत शालेय साहित्य वाटप केला आहे. त्याची सुरुवात या बरबडा येथील शाळेतून करण्यात आली आहे.आज बॅलेकेट व चटई वाटप करण्यात आले आहे.

# रात्री ऐवजी दिवसा विद्युत पुरवठा करा : राष्ट्रवादी

**वैजापूर : (समर्थ गांवकरी)**

लाडगाव सबस्टेशन अंतर्गत शेत पंपाला रात्री ऐवजी दिवसा विद्युत पुरवठा करावा या मागणीसाठी राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाच्यावतीने तालुकाध्यक्ष प्रकाश बापू ठुबे यांनी कार्यकारी अभियंता यांना निवेदन दिले. सदर निवेदनात म्हणटले आहे की, लाडगांव सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी रात्रीच्या वेळी अनेक अडचणी निर्माण होत आहेत. त्यातच बिबट्याची दहशत असल्यामुळे एकटा शेतकरी पिकांना पाणी देण्यासाठी जात नाही. बिबट्याचा हल्ला होण्याच्या भितीने शेतीमध्ये कोणाला तरी सोबत घेऊन जावे लागत आहे. तसेच अनेक वेळेस लाईट ये-जा करत असते त्यामुळे विद्युत मोटर ते शेत हे अंतर ही दुर असते. त्यामुळे, मोटार बंद झाल्यास चालु करण्यास अडचणी निर्माण होतात त्याच प्रमाणे रात्रीच्या





वेळी हिंस्त्र प्राण्यांचा हल्ला होण्याचीही भिती असते.

त्यामुळे या परिसरातच नव्हे तर संपूर्ण तालुक्यात शेत पंपासाठी रात्री ऐवजी दिवसा विद्युत पुरवठा करण्यात यावा असे निवेदनात म्हणटले आहे यावेळी सहायक अभियंता गौर यांनी निवेदन स्विकारले यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष प्रकाश बापू ठुबे, विधानसभा अध्यक्ष राजू काका कराळे, शहराध्यक्ष जुबेर चाऊस, दिपक अण्णा त्रिभुवन, संतोष सरोवर, उपाध्यक्ष योगेश सुर्यवंशी, माजी उपसरपंच नारायण पवार, यांची उपस्थिती होती.

# बालहक्क व लाईफ स्किल प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

सीतेवाडी येथे चाईल्ड फंड इंडिया प्रकल्पांतर्गत बाल हक्क मार्गदर्शन व प्रशिक्षण तसेच युवकांसाठी लाईफ स्किल डेव्हलपमेंट कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.सदर कार्यक्रमाचे नियोजन,समन्वय व एकूण मार्गदर्शन संस्थेचे प्रकल्प अधिकारी अभिजीत मदने यांनी केले.या कार्यक्रमासाठी शितळेश्वर हायस्कूल येथील मुख्याध्यापक संतोष हांडे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अजित सौर व शहाजी कसबे यांनी प्रमुख नियोजन केले तर विश्वास गालफाडे व इतर सहकाऱ्यांनी विशेष सहकार्य केले. मुख्याध्यापक श्री. संतोष हांडे यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे हा उपक्रम निश्चित व प्रभावी स्वरूपात पार



पडला. या प्रशिक्षणामध्ये बालकांचे हक्क,त्यांचे प्रकार तसेचभारतीय संविधानात नमूद केलेले प्रमुख बालहक्क सविस्तरपणे समजावून सांगण्यात आले.

यामध्ये जगण्याचा हक्क, संरक्षणाचा हक्क, विकासाचा हक्क आणि सहभागाचा हक्क या चारही मूलभूत बालहक्कांची उदाहरणांसह माहिती देण्यात आली. तसेच बालहक्कांशी संबंधित विविध कायदे, त्यांची अंमलबजावणी व बालक, पालक, शाळा आणि समाजाची भूमिका याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

# टाटा मोटर्समधील प्रशिक्षणार्थी तुकडी FTA 25 चा स्नेह मेळावा

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ज्या मातीत छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला त्या पावन भूमीत असलेल्या प्राचीन भागवत वाडा सावरगाव तालुका जुन्नर येथे शनिवारी आणि रविवारी संपन्न झाला,गावाच्या रम्य निसर्ग संपन्न झाला. संगीत महफिल मध्ये सुप्रसिद्ध गायकसुरेश वाडकर यांचे शिष्य राहुल जी दूधवडे यांनी सुमधुर गाणी ऐकवली वाड्यावरचा कौटुंबिक वातावरणातला प्रत्येक क्षण सर्व मित्रानी एन्जॉय केलाच पण त्याच बरोबर सकाळी संत निरंकारी सत्संग भवन मध्ये प्रार्थना,भजन करून सर्वांचा मान सन्मान करण्यात आला,विविध क्षेत्रात अनेक मित्रानी अष्टपैलू कामगिरी केलेली असताना प्रतिनिधीक स्वरूपात,उद्योजक येझदी आगा,प्रशासकीय अधिकारी



सर्जेराव कांदळकर आणि कामगार युनियन क्षेत्रात सलग २१ वर्ष उत्कृष्ट कामगिरी केलेल्या श्री राजेंद्र पाटील यांचा विशेष सन्मान करण्यात आला,राजेंद्र पाटील यांनी हा पुरस्कार जबलपूर निवासी अभिलाष दीक्षित व ऑस्ट्रेलिया येथे कार्यरत असलेल्या प्रशांत सुवर्णा यांच्या बरोबर हा पुरस्कार वाटून मैत्रीचा अनोखा अनुभव दाखवून दिला.

प्रसंगी मालिका नाटक दिग्दर्शक भाऊसाहेब पवार, टाटा मोटर्स चे अधिकारी शीतल पाटील आणि श्रीनिवास उलागड्डे यांनी मनोगते व्यक्त केली हा मैत्रीचा सोहळा जो अनुभवला.चिरकाल आमच्या स्मरणात राहील अशी भावना भाऊसाहेब आणि श्रीनिवास यांनी व्यक्त केली. वाटेलाही प्रश्न पडावा, पाऊलवाट शोधताना पाऊलानीच उत्तर द्यावे, वाटेवरून चालताना प्रेरणादायी भागवत वाड्यातील संत निरंकारी भवन मधील अनुभव जो जीवनाला एक प्रमुख ध्येय देण्याचं, पावलांना ताकद देण्याचं काम आणि विधायक कार्य करण्यासाठी प्रेरणा देणारी वाटली

जीवनात उंच भरारी घेण्यासाठी चांगले विचार आपल्याकडे असणे गरजेचे आहे आणि हेच विचार अंगीकारण्यासाठी संतांच्या पाऊलखुणांवर चालणे आवश्यक आहे आणि त्यासाठी भागवत वाडा एक मैलाचा दगड ठरावा अशी भावना शितल पाटील यांनी व्यक्त केली.

आचार, विचार, संस्कार, सेवाभाव, विनम्रता अश्या कितीतरी बाबींचा समावेश आपल्यात असायला हवा तेंव्हाच आपण इतरांसाठी सद्विवेकाची पाऊल वाट तयार करू शकतो असे संस्कार आमचे दैवत सर रतन टाटा यांच्या प्रॅक्टिकल जीवनातून घेऊन अनेक मित्र समाजात छान कार्य करीत आहेत

भागवत कुटुंब आपल्या वास्तू मधे सदगुरू निरंकारी सेवाभावातून आपल्या आणि अनेकांच्या जीवनात प्रकाश उजळुन टाकण्यासाठी निरपेक्ष कार्य करत आहेत,भागवत वाडा ही फक्त एक वास्तू नाही ती जीवनाकडे बघण्याचा एक विचार आहे, पुढच्या पिढी साठी तो मैलाचा दगड ठरावा अश्याच शुभेच्छा एकत्रित व्यक्त केल्या, सर्व FTA - 25 batch तर्फे भागवत वाड्या तील सत्संग सोहळ्या साठी येणाऱ्या भाविकांसाठी अन्नदाना साठी योगदान प आ रामकृष्ण महाराज यांच्या कडे सुपूर्त करून भागवत वाडयाला जी सर्वानी राम राम केला.

नंतर खानापूर येथील, अंबा अंबिका लेणी चढतांना प्रत्येकाची फिटनेस टेस्ट झाली वडज धरण परिसर पाहुन किल्ले शिवनेरी च्या पायथ्याशी समारोप करून सगळ्यांनी पुण्याकडे प्रस्थान केले. सदर मेळाव्याचे नियोजन धीरज सावंत, प्रसाद भाबल, श्रीनिवास उलागड्डे, भाऊसाहेब पवार आणि सुरेश भागवत यांनी केले.

# शालेय विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी ...1 जानेवारी 2026 आधी 'हे' काम करावे लागणार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



राज्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. खरे तर राज्यात गेल्या काही काळापासून शाळांमध्ये शिक्षक गैरहजर असणे, विद्यार्थ्यांची चुकीची हजेरी लावणे तसेच प्रत्यक्ष उपस्थित नसतानाही विद्यार्थी व शिक्षकांच्या नोंदी लावल्या जात असल्याच्या तक्रारी समोर येत होत्या.

याच तक्रारींच्या पार्श्वभूमीवर आता राज्याच्या शालेय शिक्षण विभागाकडून एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून या अडचणी सोडवण्यासाठी ठोस उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या या नव्या उपाययोजनानुसार आता राज्यातील शाळांमधील तसेच कनिष्ठ महाविद्यालयांमधील इयत्ता अकरावी व बारावीच्या सर्वच शाखांमधील विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी प्रणाली बंधनकारक राहणार आहे. याशिवाय इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची हजेरी आता 'स्मार्ट उपस्थिती' या अॅपद्वारे दररोज ऑनलाईन नोंदवावी लागणार आहे. नक्कीच नव्या निर्णयामुळे राज्यातील शिक्षणाची गुणवत्ता सुधारणार आहे. नवा निर्णय शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासोबतच या संपूर्ण शैक्षणिक प्रणालीमध्ये एक नवा बदल घडवून आणणार आहे.

जाणकारांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात अनेक ठिकाणी कौटुंबिक परिस्थितीमुळे शाळा अर्धवट सोडून कामाला जाणारे बालकामगार, शाळाबाह्य विद्यार्थी, तसेच केवळ परीक्षेच्या वेळीच शाळेत येणारे विद्यार्थी आढळून येतात. परिणामी हे विद्यार्थी शिक्षणात मागे पडतात आणि त्यांच्यावर योग्य शैक्षणिक उपाययोजना करणे कठीण होते.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या सूचनेनुसार शालेय शिक्षण विभागाने 'स्मार्ट उपस्थिती' अॅप विकसित केले आहे. या अॅपवर विद्यार्थी आणि शिक्षकांची उपस्थिती दररोज ऑनलाईन नोंदवणे सर्व शाळांना बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती, शिक्षकांची कामगिरी, शैक्षणिक गुणवत्ता आणि आवश्यक प्रशिक्षण यांचे अचूक नियोजन करता येणार असल्याचे शिक्षण विभागाचे म्हणणे आहे.

मात्र, अनेक शाळांकडून अद्यापही या निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. सोलापूर जिल्ह्यातील एकूण १,०८५ माध्यमिक शाळांपैकी केवळ ५० ते ५२ टक्के शाळाच नियमितपणे ऑनलाईन हजेरी नोंदवत असल्याची माहिती समोर आली आहे.

यामुळे शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेतली असून, ज्या शाळा ३१ डिसेंबरपर्यंत 'स्मार्ट उपस्थिती' अॅपवर हजेरी नोंदवणार नाहीत, त्या शाळांच्या मुख्याध्यापकांना प्रथम नोटीस बजावून खुलासा मागवला जाईल. त्यानंतरही कार्यवाही न केल्यास संबंधित मुख्याध्यापकांवर शिस्तभंगाची व कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी उपस्थितीची अचूक माहिती आवश्यक आहे. त्यामुळे सर्व शाळांनी या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करावी." शिक्षण विभागाच्या या निर्णयामुळे शाळांमधील शिस्त वाढून शिक्षणाची गुणवत्ता सुधारेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात बातम्या...

### अकोले : लिंगदेव केंद्रस्तरीय क्रिडास्पर्धा उत्साहात संपन्न



अकोले (स. गांवकरी) : विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, विकास व्हावा म्हणून अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या वतीने दरवर्षी केंद्रस्तर, तालुकास्तर व जिल्हास्तरावर विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. तालुक्यातील लिंगदेव केंद्रांतर्गत येणाऱ्या 15 जिल्हा परिषदेच्या शाळांतील क्रीडा स्पर्धा नुकत्याच भैरवनाथ विद्यालय चास येथे संपन्न झाल्या. यामध्ये वैयक्तिक क्रीडा प्रकारात धावणे, लांब उडी, उंच उडी, गोळा फेक, थाळीफेक आदी स्पर्धांचा समावेश होता. तर सांघिक मध्ये कबड्डी खो-खो लहान व गट व मोठा गट मुले मुली यांसाठी स्पर्धांचे आयोजन केले होते. केंद्र पातळीवर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी केंद्राचे केंद्रप्रमुख देवेंद्र आंबेटकर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना केंद्रप्रमुख आंबेटकर म्हणाले क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या उपजत कलागुणांना वाव मिळतो. ग्रामीण भागातील मुलांना चांगली संधी उपलब्ध होते. हीच मुले पुढे राज्य व राष्ट्रीय स्तरावर विशेष नैपुण्य मिळवतात. त्यामुळे जिल्हा परिषदेचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी फलदायी असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी सरपंच सुनीता शेळके, उपसरपंच सचिन शेळके, बाबुराव वाडेकर, मुख्याध्यापक सुनील चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.स्पर्धांसाठी पंच म्हणून रामदास भोजने, भाऊसाहेब गोडसे, ज्ञानदेव फापाळे, तानाजी वाडेकर, विक्रम गोरडे, अरुण कासार, ज्ञानेश्वर भांगरे, बबन औटी, भाऊसाहेब कोटकर, सतीश जाधव, आबाजी भांगरे, रूपाली देशमुख, रोहिणी लांडगे आदींनी काम पाहिले. स्पर्धा संयोजक म्हणून मुख्याध्यापक लहू कोल्हाळ, भास्कर तुरनर यांनी काम पाहिले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, विस्तार अधिकारी संभाजी झावरे यांनी अभिनंदन केले. तालुका पातळीवरील स्पर्धांसाठी विजेत्या स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

### पाल वृंदावन धाम येथे महोत्सव

रावेर (स. गांवकरी) : तालुक्याच्या दुर्गम भागात वसलेल्या श्री वृंदावन धाम पाल आश्रमात अखिल भारतीय चैतन्य साधक परिवाराचे आराध्य सद्गुरू, परमपूज्य ब्रह्मलीन संत श्री लक्ष्मण चैतन्य बापूजी यांच्या सोळाव्या पुण्यतिथीनिमित्त दि. २४ व २५ डिसेंबर रोजी दोन दिवसीय भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव विद्यमान पदस्थ श्रद्धेय संत श्री गोपाल चैतन्यजी महाराज यांच्या प्रेरणेने संपन्न होत आहे. या दोन दिवसीय महोत्सवात परमपूज्य संत श्री लक्ष्मण चैतन्य बापूजींचे गुरुवर्य संत श्री महादेव चैतन्य ऊर्फ दगडूजी बापू यांची जयंती तसेच पाल आश्रमात स्थित भव्य व दिव्य श्री हरिधाम मंदिराचा वर्धापन दिन साजरा करण्यात येणार आहे. या निमित्त दीपोत्सव व भजनसंध्येचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. दि. २५ डिसेंबर रोजी सकाळी ६ ते ७ या वेळेत श्री हरिधाम मंदिरातील परमपूज्य बापूजींच्या समाधी मंदिरात चरण पादुका पूजन व अभिषेक करण्यात येणार आहे.



ठाणे, दिवा : ठाणे महापालिका निवडणुकीच्या पाश्वभूमीवर दिव्यात साबेगावात मा. उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख निलेश पाटील व सौ. अर्चना पाटील यांच्या नेतृत्वात साबे येथील ठाकरेंच्या शिवसेनेचे मंदार सोहोनी (उपशाखाप्रमुख) तसेच सुधाकर साळूंखे, महिला आघाडीच्या मनवी सोहोनी, प्रतीक्षा भोपी यांनी केला शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. प्रसंगी बाबाजी पाटील, आकाश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. (फोटो - संतोष पडवळ)



ठाणे : मुंबईत ठाकरे बंधुची युती जाहीर होताच दिव्यात मनसे व ठाकरे शिवसेनेकडून आनंदोउत्सव साजरा करण्यात आला. प्रसंगी दोन्हीही पक्षाचे शहरप्रमुख एकमेकांना पेढे भरवून आनंद व्यक्त केला प्रसंगी दिवा मनसेचे व ठाकरे शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रसंगी रेल्वे प्रवास्यांना पेढे वाटप करण्यात आले. (फोटो - संतोष पडवळ)

# पर्यावरण संवर्धन काळाची गरज – सौ. पुष्पाताई लहामटे

**मवेशी (ता. अकोले) : (समर्थ गांवकरी)**



मवेशी येथील पोलीस व सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र परिसरात सौ. पुष्पाताई किरण लहामटे यांच्या वाढदिवसानिमित्त २५ नारळाच्या झाडांची लागवड करून वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या माध्यमातून "झाडे लावा आणि झाडे जगवा" असा पर्यावरणपूरक संदेश देण्यात आला. यावेळी सौ. लहामटे यांनी स्वतः झाडांना पाणी घालून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले.

भाषणात त्या म्हणाल्या की, पर्यावरण संवर्धनाचे संस्कार बालवयातच रुजले तर उद्याचा सुजाण व जबाबदार नागरिक घडतो. झाडे हवेतील कार्बन डायऑक्साइड शोषून ऑक्सिजन देतात, त्यामुळे हवेची गुणवत्ता सुधारते आणि प्रदूषण कमी होण्यास मदत होते. आरोग्य आणि पर्यावरणाच्या दृष्टीने वृक्षलागवड अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

या वृक्षलागवड कार्यक्रमासाठी सौ. पुष्पाताई लहामटे स्वतः उपस्थित राहिल्याने समस्त ग्रामस्थ मवेशी, पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र मवेशी तसेच आम्ही पर्यावरणप्रेमी ग्रुप यांच्या वतीने त्यांचा सन्मान करून आभार मानण्यात आले.

कार्यक्रमास सरपंच यमाजी भांगरे, बाळासाहेब शिरसाठ (आश्रमशाळा मुख्याध्यापक), आम्ही पर्यावरणप्रेमी ग्रुपचे अध्यक्ष राहुल राऊत, देशमुख मॅडम (ग्रामसेवक), उपसरपंच संतोष बोटे, बांबळे मेजर, रमेश लेंभे, दत्ता कोंडार, बांगर सर, पटेकर सर, अनिल भांगरे, रामदास भांगरे, संजय भांगरे, किरण कोंडार, सुनील कवटे, सीताराम भांगरे, भरत भांगरे, गोविंद कवटे, किसन भांगरे यांच्यासह ग्रामस्थ व प्रशिक्षणार्थी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी भरत बांबळे मेजर यांनी सर्वांचे आभार मानले.

# भारतीय राजभाषा हिंदी परीक्षेत चैतन्याचे यश



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालयातील विद्यार्थ्यांनी भारतीय राजभाषा हिंदी परीक्षेमध्ये घवघवीत यश मिळविले. या परीक्षेत विद्यालया तील ३०७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्तम श्रेणी प्राप्त केली. त्यापैकी सहा विद्यार्थ्यांना पुरस्कार प्राप्त झाला. अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. विद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख प्रदीप गाढवे म्हणाले की हिंदी भाषेचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी महात्मा गांधी राजभाषा हिंदी प्रचार संस्था , पुणे यांच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय परीक्षा आयोजित केली जाते. गेली १५ वर्षे विद्यालयात हा उपक्रम राबविला जात आहे. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यासाठी मिळतो. यावर्षी ३०७ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला व सहा विद्यार्थ्यांना पुरस्कार प्राप्त झाला.सर्व सहभागी विद्यार्थ्यांना पदक व प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला.सहा विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देण्यात आले.

# गुटखा आणि प्रतिबंधित पदार्थांची विक्री झाल्यास कारवाई



**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यात बंदी असलेल्या गुटखा आणि तत्सम अंमलीपदार्थांवर कडक कारवाई करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग सज्ज झाला आहे. यापुढे बंदी असलेले प्रतिबंधित पदार्थ सापडल्यास त्या संबंधित क्षेत्रातील अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्याचा इशारा अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी अधिकाऱ्यांना दिला. अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री होत आहे, असे निर्दशनास आल्यास त्या कार्यक्षेत्राच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल व त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे परिपत्रकही मंत्री झिरवाळ यांच्या निर्देशानंतर काढण्यात आले. या अंतर्गत सर्व विभागीय सह आयुक्त (अन्न) यांना प्रतिबंधित अन्नपदार्थांची छुप्या पद्धतीने व अवैध मार्गाने विक्री, साठा व वाहतूक करणाऱ्या व्यावसायिकावर प्रभावीपणे कारवाई करण्याचे आदेश अन्न सुरक्षा आयुक्त श्रीधर दुबे पाटील यांनीही परिपत्रकाद्वारे दिले आहेत. सह आयुक्त (अन्न), सहायक आयुक्त (अन्न) व अन्न सुरक्षा अधिकारी यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील अन्न आस्थापनांची तपासणी करावी. तसेच त्यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री, साठा व वितरण होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी व प्रतिबंधित अन्नपदार्थांचे बंदीबाबत आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले आहेत.

# पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांना पुरस्कार प्रदान

**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**



महामानव बाबा आमटे संस्था, श्रीगोंदा यांच्या वतीने आयोजित महामानव बाबा आमटे प्रबोधन व्याख्यानमाला वर्ष 13 दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी संपन्न झाले. या व्याख्यानमालेत पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित राहून अत्यंत भावनिक व्याख्यान दिले.

गरिबांचे डॉक्टर म्हणून ओळख असलेले स्वर्गीय उत्तमचंदजी लोढा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा स्व. उत्तमचंदजी लोढा मानव सेवा पुरस्कार (दहावे वर्ष) पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांना प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री भिकू (दादा) रामजी इदाते होते. विशेष म्हणजे, व्याख्याते आणि अध्यक्ष दोघेही पद्मश्री सन्मानित व्यक्ती असल्याने या कार्यक्रमास वेगळेच महत्त्व प्राप्त झाले. दोन पद्मश्री विभूती एकाच व्यासपीठावर अनुभवण्याचा योग आल्याने समस्त श्रीगोंदेकरांमध्ये समाधान आणि अभिमानाची भावना व्यक्त होत होती. कार्यक्रमाला डॉ. प्रेमकुमार भट्टड आणि न्यायमूर्ती केकान साहेब यांची उपस्थित होते.

आपल्या व्याख्यानात पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी स्वतःच्या संपूर्ण जीवनप्रवासावर आधारित अनुभव सांगितले.

सामान्य कुटुंबातून आल्यावर अनुभवलेली संघर्षाची कहाणी, शिक्षण घेताना आलेल्या अडचणी, इंग्रजी भाषेतील अडचणी, काम करताना आलेले अनुभव, तसेच आईविषयीच्या आठवणी त्यांनी अत्यंत साध्या आणि स्पष्ट शब्दांत मांडल्या.

वैद्यकीय क्षेत्रात कार्य करत असताना गरीब, वंचित आणि दुर्लक्षित घटकांसाठी सेवा करताना आलेले अनुभव, रुग्णांशी जपलेले मानवी नाते आणि डॉक्टर म्हणून समाजाप्रती असलेली जबाबदारी त्यांनी ठळकपणे अधोरेखित केली.

"ज्ञानाइतकाच माणुसकीचा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे," असा विचार त्यांनी आपल्या व्याख्यानातून मांडला.

या व्याख्यानामुळे उपस्थित श्रीगोंदेकरांना पद्मश्री सन्मानित व्यक्तीपेक्षा एक संवेदनशील, प्रामाणिक आणि समाजाशी जोडलेला लोकसेवक जवळून अनुभवता आला.

या प्रसंगी संस्थेतील समर्पित सेविका अश्विनी बारबोले, संस्थेचे माजी विद्यार्थी महेश काळे व सध्या प्रशासकीय सेवेत कार्यरत असलेले शिवप्रसाद जाधव, तसेच संस्थेचे माजी विद्यार्थी व विंग्रो कंपनीचे संस्थापक मयूर पवार यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल विषय सन्मान देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रशेखर पाटील यांनी केले. प्रस्तावना संस्थेचे अनंत झेंडे यांनी केले. प्रमुख व्याख्याते आणि अध्यक्ष यांचा परिचय डॉ. अरुण रोडे यांनी करून दिला तर आभार डॉ. सुयोग मराठे यांनी मानले.

महामानव बाबा आमटे यांच्या विचारांचा जागर करणारी ही व्याख्यानमाला उपस्थित समस्त श्रीगोंदेकर आणि श्रोत्यांसाठी प्रेरणादायी ठरली.

# आचारसंहितेचे उल्लंघन केल्यास गुन्हे दाखल होणार : यशवंत डांगे

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम सुरू झाला आहे. आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी प्रशासनाकडून करण्यात येत आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार आचारसंहिता काळात प्रचार सभा, प्रचाराची रॅली यासाठी किमान ४८ तास अगोदर परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच, प्रचारासाठी वापरले जाणारे साहित्य, सोशल मीडियावर प्रचारासाठी वापरला जाणारा मजकूर आदींचीही पूर्वपरवानगी आवश्यक आहे. उमेदवारासह सूचक व अनुमोदकाचेही ना देय प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. सर्वांनी आचारसंहितेचे पालन करावे, उल्लंघन केल्यास गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे. निवडणूक कार्यक्रम, आचारसंहिता, निवडणूक अधिकारी, प्रशासनाकडून उपलब्ध सुविधा, उमेदवारी अर्ज, विविध प्रकारच्या परवानग्या व याबाबत राज्य निवडणूक आयोगाने दिलेले निर्देश आदींची माहिती देण्यासाठी शहरातील राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींची बैठक महानगरपालिकेत आयोजित करण्यात आली होती. आयुक्त यशवंत डांगे यांच्यासह सर्व निवडणूक अधिकारी, आचारसंहिता कक्षाच्या प्रमुखांनी उपस्थितांना निवडणूक प्रक्रियेची माहिती दिली.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, निवडणुकीचा जाहीर प्रचार १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत करता येणार आहे. मतमोजणी राज्य वखार महामंडळाच्या एमआयडीसी येथील गोडावून क्रमांक ६ व ७ येथे होणार आहे. राजकीय पक्षाच्या उमेदवारांना एबी फॉर्म ३० डिसेंबर रोजी दुपारी २ वाजेपर्यंत दाखल करावे लागतील. निवडणुक खर्चाचा तपशील रोजच्या रोज देणे बंधनकारक आहे. नामनिर्देशन पत्रासोबत सर्व सुचना देण्यात आलेल्या आहेत. उमेदवारी अर्जासोबत जातवैधता प्रमाणपत्र, ना देय प्रमाणपत्र, वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. नॉन क्रिमीलियरची आवश्यकता नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

उपजिल्हाधिकारी सायली सोळंके म्हणाल्या की, प्रचारसाठीचे वाहन वापर, सभा, रॅली, पोष्टर छपाई, बॅनर, प्रचार कार्यालय आदींना परवानगी घ्यावी लागेल.

मजकुर प्रमाणीकरण करून घ्यावा. सोशल मिडीया, व्हॉटसअप वरील प्रसिध्द करण्यात येणा-या मजकुर/माहिती प्रसिध्द करण्यापुर्वी समितीकडून प्रमाणीकरण करून घेण्यात यावे.

यासाठी झालेल्या खर्चाचा निवडणुक खर्चात समावेश होईल. परवानगी न घेता व आचारसंहितेचे उल्लंघन केल्यास संबधीताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात येईल. राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींकडून उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांवर आयुक्तांसह संबंधित अधिकाऱ्यांनी आवश्यक माहिती उपलब्ध करून दिली.

पोलिस उपअधीक्षक दिलीप टिपरसे यांनी सांगितले की, जातीय व धार्मिक समीकरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्यावी. जात, धर्म भावना दुखावल्या गेल्याचे निदर्शनास आल्यास कलम २९९नुसार संबधीताविरुध्द गुन्हा दाखल होईल.

ज्यांच्याविरूध्द मागील निवडणुक कालावधीत गुन्ह दाखल असतील त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच, मागील २० वर्षात ज्यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत, त्यांच्यावर तडीपारीची कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# महत्वाचा महामार्ग चौपदरी होणार !

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील आणखी एका राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचा महत्त्वाचा निर्णय झाला आहे. खरंतर, गेल्या काही वर्षांमध्ये राज्यातील हजारो किलोमीटर लांबीच्या राष्ट्रीय महामार्गांचे रुंदीकरण करण्यात आले आहे.

तसेच काही नवीन महामार्गांची देखील निर्मिती करण्यात आली आहे. अशातच आता महाराष्ट्रातून जाणाऱ्या एका नव्या महामार्गाबाबत महत्त्वाचे अपडेट समोर आली आहे. महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यांना जोडणाऱ्या एका महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचा महत्वाचा निर्णय झाला असल्याची समजते.

यामुळे महाराष्ट्र आणि गुजरात राज्याच्या सीमेवर असणाऱ्या सापुतारा या हिल स्टेशनला जाणे सोयीचे होणार आहे. कारण की,



केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्रालयाने नाशिक जिल्ह्यातील वणी ते गुजरातमधील सापुतारा या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या प्रकल्पासाठी भूसंपादनाची अंतिम अधिसूचना सुद्धा जाहीर करण्यात आली असून, त्यामुळे प्रत्यक्ष कामाला गती मिळणार आहे. यातील पहिला टप्पा हा वणी ते हातगड असा राहील. पहिल्या टप्प्यात सुमारे १७ किलोमीटरचा रस्ता चौपदरी करण्यात येणार आहे. हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर नाशिक ते सापुतारा प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सोयीस्कर ठरणार आहे.

सध्या वणी ते हातगड हा मार्ग दुहेरी व घाटाचा असल्याने वाहतूक कोंडी, अपघात आणि वेळेचा अपव्यय होत आहे. चौपदरीकरणामुळे या समस्या मोठ्या प्रमाणात कमी होतील. तसेच पर्यटकांची वाढती संख्या लक्षात घेता हा रस्ता भविष्यातील वाहतूक भार पेलण्यास सक्षम ठरणार आहे. महाराष्ट्र व गुजरातमधील प्रसिद्ध पर्यटन आणि धार्मिक स्थळांना जोडणारा हा मार्ग वेळ आणि खर्चाची बचत करणारा ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक ते वणी या रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने यापूर्वीच सुमारे १०० कोटी रुपयांच्या कामास मंजुरी दिली आहे. त्यामुळे सिंहस्थपूर्व काळातच नाशिक ते सापुतारा हा संपूर्ण मार्ग अधिक सुलभ होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. केंद्रीय मंत्रालयाने २०२४ मध्ये भूसंपादनाची प्राथमिक नोटीस काढून हरकती मागविल्या होत्या.

मात्र, कोणतीही हरकत न आल्याने आता अंतिम अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे. या महामार्गाचा लाभ केवळ नाशिकपुरता मर्यादित न राहता धुळे व नंदुरबार जिल्ह्यांनाही होणार आहे. धुळे-मालेगाव मार्गे नाशिक आणि पुढे वणी येथे या चौपदरी महामार्गाशी वाहने जोडली जातील, तर नंदुरबार जिल्ह्यातून शहादा-धुळे-मालेगाव मार्गे येणाऱ्या वाहनांना सापुतारा, हातगड व नाशिककडे जाण्यासाठी सुरक्षित पर्याय मिळेल. गुजरातकडून सापुतारा-हातगड मार्गे येणारी वाहतूकही या महामार्गाला जोडली जाणार आहे. या प्रकल्पामुळे पर्यटन, व्यापारी आणि कृषी मालवाहतूक वाढण्यास चालना मिळणार असून, उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे व नंदुरबार जिल्ह्यांच्या आर्थिक विकासाला मोठी गती मिळणार आहे.

# किनवट नगर परिषद उपनगराध्यक्ष व स्विकृत सदस्य पदा करिता रस्सीखेच

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत नगराध्यक्ष पदी शिवसेना उबाठा गटाच्या सौ. सुजाता विनोद ऐंड्रलवार ह्या ३९९६ मताधिक्क्याने विजयी झाल्या नंतर एकतर्फी झालेली निवडणुक युवा नेते करण ऐंड्रलवार यांनी "लगान चित्रपटातील" भारतीय संघातील टीम प्रमाणे आपली टीम प्रतित व्हावी अशी टीम घेऊन हि निवडणुक लढवली ज्यामध्ये एकतर्फी विजय खेचुन आणला. तरी आता उपनगराध्यक्ष पदा करिता सर्वच इच्छुकांमध्ये रस्सीखेच सुरु झालेली आहे, यामध्ये आकडेमोड करने सुरु झालेले आहेत. तर भाजपा गठीत महायुतीची सत्ता आली असती तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे माजी नगराध्यक्ष साजिद खान यांच्याकडे उपनगराध्यक्ष पद निवडणुकीच्या पुर्वी झालेल्या चर्चेअंती गेले असते

महाविकास आघाडी तर्फे प्रभाग क्रमांक २ मधुन निवडुन आलेले हसन लाला खान हे उपनगराध्यक्ष पदाच्या शर्यतीत आघाडीवर असुन ते माजी आमदार स्व. प्रदीप नाईक यांचे अत्यंत निष्ठावान असुन त्यांना निवड्णुकीत महायुतीचे साजिद खान यांनी घड्याळ निशानी घेऊन निवडणुक लढवण्याचे प्रस्ताव दिले असता त्यांनी स्वतःच्या पक्षाशी एकनिष्ठ राहण्याचा पर्याय स्विकारला होता तर झालेल्या निवडणुकीत आघाडीतील सहयोगी उमेदवार व नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारास आपल्या प्रभागातुन प्रचंड मतदान मिळवुन दिले.

परंतु साजिद खान हे पराभुत झाले असुन त्यांच्या पत्नी जरीना खानम खान विजयी झाल्या आहेत. तरी आता महाविकास आघाडीची सत्ता आल्याने उपनगराध्यक्ष पदा संदर्भात काय घडामोडी घडतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.तरी सभागृहातील पक्षीय बलाबल पाहता शिवसेना उ.बा. ठा. पक्षाचे ३ सदस्य निवडुन आले तर सहयोगी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे ५ सदस्य निवडुन आहे तर महाविकास आघाडी पुरस्कृत २ अपक्ष सदस्य निवडुन आलेले आहेत. तर महायुतीचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ५, भाजपाचे ४, शिवसेना शिंदे गटाचे १ असे पक्षिय बलाबल असुन यामध्ये प्रभाग क्रमांक १ मधुन अपक्ष निवडुन आलेले ३ नगरसेवक सौ. प्रिती धिरज नेम्मानिवार, प्रभाग क्रमांक ७ मधुन निवडुन आलेल्या सौ. ललिता मारोती मुनेश्वर, प्रभाग क्रमांक ५ मधुन निवडुन आलेले चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार ह्यांच्याकडे निर्णायक मत असल्याने त्यांचे महत्व वाढले आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आखरगा येथील शाळेचा चौकशी अहवाल गुलदस्त्यात

- गैरव्यवहार स्पष्ट असूनही मौन का गट शिक्षण अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्न चिन्ह

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आखरगा ता. मुखेड येथील गंभीर अनियमितता, शालेय व्यवस्थापन समितीतील गैरव्यवहार, शासन नियमांचे उल्लंघन आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित करणारा चौकशी अहवाल जाणीवपूर्वक दडपून ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप गट शिक्षण अधिकारी बी. एम. पाटील यांच्यावर करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे शिक्षण विभागाची विश्वासार्हता धोक्यात आली असून प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र संशय व्यक्त होत असून अनेकांनी प्रश्न चिन्ह उपस्थितीत केले जात आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, प्रभारी विस्तार अधिकारी यू. पी. चव्हाण यांनी चौकशी पूर्ण करून अहवाल गट शिक्षण अधिकारी कार्यालयात सादर केला आहे. मात्र, तो अहवाल पुढे वरिष्ठ कार्यालयात पाठवण्यात आलेला नाही, तसेच अर्जदाराला प्रमाणित प्रत देण्यासही टाळाटाळ करण्यात येत आहे.

हा प्रकार शासकीय चौकशी नियम, माहिती अधिकार कायदा व नागरी सेवा नियमांचे उल्लंघन असल्याचे स्पष्ट होत आहे.

अहवाल दडपणे म्हणजे थेट जबाबदारी टाळणे शाळेत खोटी पटसंख्या, शिक्षकांची नियमित अनुपस्थिती, पोषण आहारातील गैरव्यवहार, शालेय व्यवस्थापन समिती (SMC) नियमभंग आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी अत्यावश्यक असलेल्या CCTV यंत्रणेचा अभाव अशा गंभीर बाबी चौकशीत उघडकीस आल्या असतानाही अहवाल दडपून ठेवणे म्हणजे

दोषींना वाचवण्याचा प्रयत्न असून त्याची संपूर्ण प्रशासकीय जबाबदारी प्रभारी गटशिक्षण अधिकारी बी. एम. पाटील यांच्यावरच येते, असा ठाम आरोप होत आहे. या प्रकरणात जिल्हा परिषद शाळा आखरगा येथे कार्यरत असलेल्या एका सेवा ज्येष्ठ शिक्षिकेच्या वर्तनावरही तीव्र आक्षेप घेण्यात आला आहे.

# कंट्रोल रुमची स्थापना

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

राज्य निवडणूक अयोगाच्या आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमबजावणीसाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या अधिपत्याखाली पालिका मुख्यालयात आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. आचारसंहिता व नियंत्रण कक्षामध्ये नागरीकांकरीता आचारसंहिता भंग संदर्भात तक्रारी नोंदविण्याकरीता टोल फ्रि दुरध्वनी क्रमांक उपलब्ध करुन देण्यात येणार असुन सदर कक्षामध्ये प्राप्त होणाऱ्या तोंडी व लेखी तक्रारी संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे तात्काळ चौकशी करीता पाठविण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सदर तक्रारी संबंधीत कार्यक्षेत्राच्या FST/SST/VST/VVT पथकाकडे तात्काळ चौकशी करीता पाठविणे आवश्यक आहे.

# निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक 2025-26 दि. 15 जानेवारी 2026 रोजी होत असून निवडणुकीसाठी ठाणे महापालिकेची संपूर्ण तयारी पूर्ण झाली असून शांततापूर्ण वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असल्याची माहिती आज झालेल्या पत्रकार परिषदेत निवडणूक अधिकारी तथा आयुक्त सौरभ राव यांनी दिली. निवडणूकीचा कार्यक्रम हा लोकशाहीचा उत्सव असून या उत्सवात सर्वांनी सहभागी होवून जास्तीत जास्त मतदान करावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झालेल्या पत्रकार परिषदेस अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त निवडणूक उमेश बिरारी, जी.जी. गोदेपुरे, मिताली संचेती, दीपक झिंजाड आदी उपस्थित होते.



निवडणुकीसाठी सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून 23 ते 29 डिसेंबर, 2025 (सकाळी 11 ते दुपारी 3) दि.30 डिसेंबर, 2025 (सकाळी 11 ते दुपारी 2) या कालावधीत नामनिर्देशन अर्जाचे वाटप व दाखल करता येणार आहे. 31 डिसेंबर 2025 रोजी छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द केली जाणार आहे. उमेदवारी मागे घेण्याचा दिनांक 2 जानेवारी 2026 असून 3 जानेवारी 2026 रोजी निवडणूक चिन्ह नेमूनदिले जाणार आहे. अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी 03 जानेवारी रोजी प्रसिध्द केली जाणार आहे. 15 जानेवारी 2026 रोजी मतदान होणार असून 16 जानेवारी 2026 रोजी मतमोजणी होईल व त्यानंतर 19 जानेवारी 2026 रोजी निवडून आलेल्या उमेदवारांची यादी राजपत्रात प्रसिध्द केली जाणार असल्याची माहिती आयुक्त सौरभ राव यांनी दिली.

ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकूण प्रभाग 33 असून सन 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या 18,41,488 इतकी आहे. सर्वात जास्त लोकसंख्या असलेला प्रभाग क्र. 25 असून लोकसंख्या - 62,697 इतकी तर सर्वात कमी लोकसंख्या असलेला प्रभाग क्र. 29 असून लोकसंख्या - 38,172 इतकी आहे. एकूण मतदारांची संख्या 16,49,867 इतकी असून पुरूष मतदारांची संख्या 8,63,878 महिला मतदारांची संख्या - 7,85,830 व इतर मतदारांची संख्या - 159 आहे. प्रभाग समितीनिहाय 11 निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी 1, 2, 3 यांची नेमणूक करण्यात आली आहे.

33 प्रभागात एकूण 2013 मतदान केंद्रे असून प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी 1,2,3 व शिपाई यांच्या नेमणुका करण्यात येत असून 20 टक्के राखीव असे मिळून एकूण 12,650 अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

# जामखेडमध्ये शुक्रवारी भाजपच्या ऐतिहासिक विजयाचा जल्लोष

## प्रा. राम शिंदेंच्या उपस्थितीत नगराध्यक्षा व सर्व नगरसेवकांचा भव्य नागरी सत्कार

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या सक्षम नेतृत्वाखाली लढवण्यात आलेल्या जामखेड नगरपरिषद निवडणुकीत भाजपने दैदीप्यमान आणि ऐतिहासिक विजय मिळवत नगरपरिषदेवर निर्विवाद सत्ता स्थापन केली आहे. या ऐतिहासिक विजयानंतर शुक्रवारी (२६ डिसेंबर रोजी) भाजपच्या वतीने विजयोत्सव साजरा केला जाणार आहे. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या विजयोत्सवात नगराध्यक्षासह नवनिर्वाचित १५ नगरसेवकांचा भव्य सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर (आबा) राळेभात हे असणार आहेत.

जामखेड नगरपरिषदेच्या निवडणूकीत भाजपने रोहित



पवारांच्या राजकीय महत्वकांक्षेला सुरुंग लावला. या निवडणुकीत राष्ट्रवादीचा दारूण पराभव करत भाजपने नगराध्यक्षासह नगरसेवकपदाच्या १५ जागांवर दिमाखदार विजय मिळवला. जामखेडकरांनी विकास, स्थैर्य आणि अनुभवी नेतृत्वावर विश्वास टाकत भाजपला नगरपरिषदेत स्पष्ट कौल दिला. भाजपच्या उमेदवारांनी बहुतांश प्रभागांमध्ये निर्णायक आघाडी घेत दणदणीत विजय संपादन केला. तर विरोधकांच्या आसुरी महत्वकांक्षेचा पुरता चुराडा झाला. घवघवीत यश संपादन करत भाजपने जामखेडच्या राजकारणात नवा अध्याय लिहीला आहे.

संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत प्रा. राम शिंदे यांचे नेतृत्व निर्णायक ठरले. त्यांनी मायक्रो प्लॅनिंग करत निवडणुकीत राबवलेली रणनिती प्रचंड यशस्वी ठरली. शिंदे यांचा प्रत्येक डाव यशस्वी ठरला. टोकाची टीका टिप्पणी, विखारी प्रचार न करता, विकासाच्या मुद्द्यावर शिंदे यांनी जनतेची मने जिंकली. संघटनात्मक ताकद, कार्यकर्त्यांची फळी आणि जनतेशी थेट संवाद या त्रिसूत्रीच्या जोरावर भाजपने ही निवडणूक जिंकली. जामखेडकरांनी भाजपच्या विकासाभिमुख धोरणावर आपला विश्वास अधोरेखित केला.

जामखेड नगरपरिषद निवडणुकीत प्रांजल अमित चिंतामणी यांनी प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून निवड होत इतिहास रचला आहे. त्यांच्या या विजयामुळे जामखेड नगरपरिषदेत नव्या पर्वाला सुरुवात झाली असून महिला नेतृत्वालाही बळ मिळाले आहे. तसेच भाजपचे नव-निवाचित नगरसेवक मोठ्या संख्येने विजयी झाल्याने जामखेड शहरात भाजपची पकड अधिक मजबूत झाली आहे. जामखेड नगरपरिषदेतील भाजपचा हा विजय केवळ निवडणुकीपुरता मर्यादित नसून, भाजपच्या संघटनात्मक ताकदीचा आणि नेतृत्वावरील जनतेच्या विश्वासाचा स्पष्ट कौल मानला जात आहे.

या ऐतिहासिक विजयानंतर जामखेड येथे नव-निर्वाचित नगराध्यक्षा प्रांजल अमित चिंतामणी व भाजपच्या १५ नगरसेवकांचा भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

# जि. प. अध्यक्ष चषक स्पर्धेत कुंडाणे 'ओ' शाळेची घवघवीत कामगिरी

**कळवण : (समर्थ गांवकरी)**

कळवण आज संपन्न झालेल्या जिल्हा परिषद अध्यक्ष चषक स्पर्धेत कुंडाणे 'ओ' येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने उज्वल यश संपादन करत ओतूर केंद्रांत आपला दबदबा निर्माण केला आहे. समूहगीत गायन स्पर्धेत ओतूर केंद्रातील तब्बल १५ शाळांमधून कुंडाणे 'ओ' शाळेने प्रथम क्रमांक पटकावला, ही बाब गावासाठी अभिमानास्पद ठरली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरेल गायनाने परीक्षकांसह उपस्थितांची मने जिंकली. याच स्पर्धेत कुंडाणे 'ओ' शाळेच्या आदिती योगेश देवरे हिने वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत आपल्या प्रभावी भाषणकौशल्याची छाप उमटवली.

# ग्रामीण कलावंतांच्या सन्मानासाठी माळेगाव यात्रेत कला मंच - आमदार आनंदराव बोंढारकर

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**

श्रीक्षेत्र माळेगाव यात्रा- मीडिया सेंटर, दिनांक २४ डिसेंबर- ग्रामीण भागातील लोककलावंतांना आपली कला सादर करण्यासाठी माळेगाव यात्रेत स्वतंत्र कला मंच उपलब्ध करून देण्यात आला असून, त्यांच्या कलेचे कौतुक व्हावे हाच या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे, असे प्रतिपादन आमदार आनंदराव बोंढारकर यांनी केले.

यावर्षी माळेगाव यात्रेचे सुयोग्य नियोजन करण्यात आले असून, भाविकांना आवश्यक त्या सर्व सुविधा प्रशासनाच्या समन्वयातून उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

माळेगाव यात्रेत जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित पारंपरिक लोककला महोत्सवाचे उद्घाटन आमदार आनंदराव





बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमप्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा यात्रा सचिव डी. बी. गिरी, गट विकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप यांच्यासह विविध मान्यवर मंचावर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांचा काठी व घोंगडी देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गट विकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी यांनी केले. सरपंच प्रतिनिधी हणमंत धुळगंडे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी नरेंद्र गायकवाड, रोहित पाटील, अशोक मोरे, भाऊराव मोरे,उद्धव शिंदे आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन परशुराम कौशल्ये यांनी केले तर आभार प्रदर्शन धनंजय देपांडे यांनी केले.

# माजी प्राचार्य बी.एन. चव्हाण यांचे निधन

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड येथील नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य बी.एन. चव्हाण वय 84 वर्षे यांचे एका खाजगी रूग्णालयात आज निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता कळताच सर्वत्र शोककळा पसरली आहे. नांदेड येथील नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालयाच्या उभारणीमध्ये त्यांचे मोठे योगदान होते. याच महाविद्यालयात अनेक वर्षे त्यांनी प्राचार्य म्हणून काम पाहिले. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांचे ते सख्खे चुलत भाऊ व भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष नरेंद्र चव्हाण यांचे ते वडिल होते. प्राचार्य बी.एन. चव्हाण यांचे शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात मोठे योगदान होते.



त्यासोबतच जिल्ह्याच्या शैक्षणिक वाटचालीमध्ये त्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली मराठवाडा असून विद्यापीठाच्या नांदेड उपकेंद्राचे ते अनेक वर्षे संचालक होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या उभारणीत त्यांनी पुढाकार घेतला होता. मागील काही वर्षांपासून ते आजारी होते येथील एका खाजगी रूग्णालयात त्यांचे आज निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता कळताच माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर, माजी आ. सौ. अमिताताई चव्हाण, माजी पालकमंत्री डी.पी. सावंत, माजी आ. अमरनाथ राजूरकर, आ. श्रीजयाताई चव्हाण यांच्यासह अनेकांनी शोक व्यक्त केला आहे.

# कष्ट, प्रयत्न आणि सातत्यामुळेच यशाचे शिखर गाठता येते

- बाळकृष्ण गोटीपामूल : श्री.नाथ विद्या मंदिर विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

वर्षातून एकदा विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे व यशाचे कौतुक होण्याचा दिवस म्हणजे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ होय. या मंचावरून विद्यार्थ्यांबरोबरच पालकांनाही प्रेरणा मिळते. यश सहज मिळत नाही, त्यासाठी कष्ट, प्रयत्न आणि सातत्य आवश्यक आहे. ही त्रिसूत्री अंगीकारली तरच यशाचे शिखर गाठता येते, असे प्रतिपादन मार्कंडेय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य बाळकृष्ण गोटीपामूल यांनी केले.




वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री. नाथ विद्या मंदिर विद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व विविध गुणदर्शन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून माजी प्राचार्य बाळकृष्ण गोटीपामूल उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कासार पिंपळगाव येथील छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य दादासाहेब भोईटे होते.

यावेळी माजी प्राचार्या डॉ.रेखा राणी खुराना, प्राचार्य डॉ.श्याम पंगा, डॉ.वेणु कोला, संदीप कांबळे,प्राचार्या अनुराधा चव्हाण, सविता सानप, सुचित्रा डावरे, विजया नवले, मीरा नराल आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या 'गगन भरारी' या हस्तलिखिताचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. श्री.गोटीपामुल पुढे म्हणाले की सेवा शिक्षण प्रसारक संस्थेची शैक्षणिक प्रगती हि नावाप्रमाणे सर्वसामान्य पालकांना शिक्षणाची सेवा देत आहे. प्राथमिक शाळेपासून सुरू झालेली ही संस्था आज इंजिनिअरिंग, फार्मसी, आयुर्वेद अशा विविध व्यावसायिक शिक्षण शाखांपर्यंत पोहोचली आहे, ही अभिमानाची बाब आहे. तंत्रज्ञानाच्या युगात स्पर्धा वाढली असून या स्पर्धेत टिकण्यासाठी सतत अपडेट राहणे गरजेचे आहे

मोबाईल व संगणकाचा वापर मनोरंजनापुरता न ठेवता शिक्षण, ज्ञानवृद्धी आणि प्रगतीसाठी करावा. वाचनाची आवड जोपासा. 'श्यामची आई' या पुस्तकातून साने गुरुजींनी आईचे महत्त्व आणि संस्कारांचे मोल अधोरेखित केले आहे.

शिक्षकांचा व वडीलधाऱ्यांचा सन्मान ठेवा, पर्यावरणाचे रक्षण करा, चांगले मित्र मैत्रिणी निवडा आणि देशाला अभिमान वाटेल असे नागरिक बना, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

अध्यक्षीय भाषणात दादासाहेब भोईटे म्हणाले की, पालकांनी विद्यार्थ्यांना प्रत्येक गोष्ट सहज उपलब्ध करून दिल्यास ते लाडावतात. त्यामुळे पालकांनी काही गोष्टींसाठी 'नाही' म्हणण्याची सवय लावली पाहिजे.आमच्या काळात छडी होती आणि त्या शिस्तीतूनच विद्या मिळत होती,असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात मुख्याध्यापिका अनिता सिद्दम यांनी वर्षभर राबविलेल्या विविध शालेय व सहशालेय उपक्रमांचा आढावा घेतला. कार्यक्रमात चिमुकल्यांनी नृत्य, नाट्य व विविध कलागुणांचे सादरीकरण केले. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षा कबाडी मॅडम यांनी केले तर आभार मीनाक्षी यन्नम यांनी मानले.

# पक्ष बदलणार नाही', असे लिहून देता का?

श्रीवर्धन नगरपरिषदेत उद्धवसेनेचे अतुल चौगुले नगराध्यक्ष म्हणून निवडून आले. अंगावरचा गुलाल उतरायच्या आतच त्यांनी आपण शिंदेसेनेसोबत आहोत, असे सांगून टाकले. ज्या मतदारांनी उद्धवसेनेचे उमेदवार म्हणून त्यांना मतदान केले असेल, त्यांच्या मतांची क्षणार्धात राखरांगोळी झाली. हे असे फक्त एकाच पक्षाबद्दल घडत नाही. मतदारांचे काम फक्त मतदान करणे आहे. विजयानंतर त्या उमेदवाराने कोणत्या पक्षात जायचे, कोणासोबत संसार थाटायचा, याचे कसलेही बंधन त्याच्यावर उरत नाही. 'आम्ही तुमच्या पक्षाच्या विचारावर विश्वास ठेवून मतदान केले होते. आता तुम्ही पक्ष का बदलला?' - असा सवाल करण्याची सोय नाही. कोणी विचारलेच, तर 'तुम्हाला तुमच्या मतांचे पैसे मिळाले ना?' - असे ऐकवायला विजयी उमेदवार कमी करणार नाहीत. एकेकाळी पक्ष आणि भूमिका बघून लोक मतदान करायचे. डावे, उजवे, पुरोगामी, समाजवादी या शब्दांना काही अर्थ होता. उमेदवारांना पक्षाची गरज असायची. राजकारण बदलत गेले. निवडून येऊ शकणाऱ्या, आपापले मतदारसंघ सुभेदारासारखे सांभाळणाऱ्या सुभेदारांचा पक्ष अशी ओळख शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने तयार केली. उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत आघाडी करत सरकार स्थापन केले आणि पक्षा-पक्षातले फरक, भिंती गळून पडल्या. आता पक्षांना निवडून येण्याची क्षमता असणाऱ्या उमेदवारांची गरज पडते. ताकदवान उमेदवार सोयीच्या पक्षात जातात. सकाळी एका पक्षात असणारा नेता दुपारी दुसऱ्या पक्षात जातो.



## संपादकीय

दुसऱ्या पक्षातला नेता संध्याकाळी तिसऱ्या पक्षात येतो. निवडून येणाऱ्यांसाठी पवित्र-अपवित्र काहीही उरलेले नाही. मतदान हा पवित्र हक्क असून, लोकशाही वाचवण्याची ताकद आपल्या बोटात आहे, असे मतदार मानतात. मात्र, निवडून आल्यावर या पक्षातून त्या पक्षात उड्या मारणाऱ्या नेत्यांना असाहाय्यपणे बघत राहण्यापलीकडे आपण करतो काय? तुम्ही ज्यांना मतदान कराल, तो त्याच पक्षात राहील याची कसलीही खात्री तो उमेदवार देत नाही. ज्या पक्षातर्फे तो उभा आहे, तो पक्ष तरी कुठून तशी खात्री देणार...? आपण ज्यांना मतदान करतो ते आपल्या मतांची किती कदर करतात, हे तपासण्यासाठी एक प्रयोग करून बघा. त्यासाठी चार-पाचशे रुपये खर्च करावे लागतील. शंभर रुपयांचे चार-पाच स्टॅम्प पेपर आणून ठेवा. तुमच्या वॉर्डात निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराकडून, 'मी निवडून आल्यानंतर कोणत्याही दुसऱ्या पक्षात जाणार नाही. जर गेलो, तर माझा हाच राजीनामा समजावा', असा मजकूर लिहून त्याखाली त्याची सही मागा. त्यावर त्याची काय प्रतिक्रिया येते, ते नक्की बघा. सोबत आणलेला प्रचाराचा कागदही तुम्हाला न देता ते पाठ फिरवून निघून जातील. उलट तुम्हालाच वेड्यात काढतील. एकही उमेदवार सही करणार नाही. जर एखाद्या उमेदवाराने अशा स्टॅम्प पेपरवर सही केलीच, तर त्याचा जाहीर सत्कार करा. सगळे मिळून त्याला निवडून द्या. मतदार म्हणून असा बाणेदारपणा दाखवण्याची वेळ आली आहे. दुर्दैवाने, पाच वर्षांचे केबलचे पैसे भरा, सोसायटीच्या इमारतीला रंग लावून द्या, अशा मागण्या सोसायट्यांमधून होऊ लागल्या आहेत. अशा सहज विकल्या जाणाऱ्या 'मतदारा'ची भीती कोणत्या उमेदवाराला वाटेल?, इतक्या स्वस्तात विकले जाणारे मतदार कोणाला नको आहेत?, मुंबईत एका कुख्यात गुंडाने निवडणुकीच्या काळात प्रत्येक घरात व्हेज, नॉनव्हेज बिर्याणीची पाकिटे पाठवली. जे दारू पितात त्यांच्या घरी रोज दारूची एक बाटलीही पाठवली.



## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ६३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 1 | | 2 | | 6 | | 4 | 5 |
| 5 | | | 1 | | | | | 8 |
| 8 | 2 | | | 5 | 4 | | | 7 |
| 2 | 5 | | 6 | 9 | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | 1 | 8 | | 2 | 6 |
| 3 | | | 4 | 6 | | | 7 | 2 |
| 1 | | | | | 9 | | | 4 |
| 4 | 7 | | 3 | | 5 | | 6 | 9 |

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ६२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 3 | 7 | 6 | 5 | 1 | 2 | 9 | 8 |
| 5 | 9 | 1 | 2 | 7 | 8 | 3 | 4 | 6 |
| 6 | 8 | 2 | 4 | 9 | 3 | 5 | 1 | 7 |
| 2 | 7 | 4 | 8 | 3 | 9 | 6 | 5 | 1 |
| 8 | 6 | 5 | 1 | 2 | 4 | 9 | 7 | 3 |
| 3 | 1 | 9 | 7 | 6 | 5 | 8 | 2 | 4 |
| 1 | 2 | 3 | 9 | 4 | 6 | 7 | 8 | 5 |
| 9 | 5 | 8 | 3 | 1 | 7 | 4 | 6 | 2 |
| 7 | 4 | 6 | 5 | 8 | 2 | 1 | 3 | 9 |

उत्तर उद्याच्या अंकात

पंचांग
२५डिसेंबर२०२५
गुरूवार
विक्रम संवत्- २०८२
पौष शके संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम

अयन- उत्तरायणारंभ
मास- पौष
ऋतु- हेमंत
शुक्ल पक्ष
तिथि:पंचमी १३:४२:५९
नक्षत्र:धनिष्ठा

०८:१८:१३
योग:वज्र १५:१३:०१
करण:बालव १३:४२:५९
करण:कौलव
२५:४७:३०+
सूर्य:धनु

## उपदेशाचे डोस

### ध्यान प्रार्थनेचे सर्वोच्च रूप

प्रार्थना ईश्वराशी एकरुप होण्याची प्रभावी पद्धत आहे. लोक विविध प्रार्थना करतात. काही लोक संसारिक वस्तूंसाठी प्रार्थना करतात. उदाहरणार्थ चांगली नोकरी, नवे घरे किंवा नवी कार. काही लोक आरोग्यासाठी प्रार्थना करतात ज्यामुळे ते किंवा त्यांचे कुटूंब सुदृढ व्हावे. काही लोक वैयक्तिक संबंध वृद्धींगत होण्यासाठी प्रार्थना करतात. पण बहुतांश लोक संसारिक वस्तुंसाठीच प्रार्थना करतात. सामान्यपणे जेव्हा आपण प्रार्थना करतो तेव्हा आपण ईश्वराकडे स्वत:साठी काहीतरी मागतो. आपण नेहमी त्या वस्तूंसाठी प्रार्थना करतो, ज्या आपल्यासाठी फायदेशीर ठरतील. त्यावेळी आपली जीवनाबाबत माहिती मर्यादित असते. अनेकदा आपण अशा गोष्टींसाठी प्रार्थना करु शकतो ज्या आपल्यासाठी फायदेशीर आहेत पण अखेरीस त्या गोष्टी आपल्यासाठी फायदेशीर ठरत नाही. आपण प्रार्थना करुन एखादी वस्तू मिळवू शकतो पण मोठ्या काळानंतर ती आपल्या लायक नसल्याचे दिसते.

म्हणून मी समजतो की, प्रार्थनाची योग्य पद्धत ईश्वराची इच्छा आपल्या जीवनात उतरवणे. म्हणून अनेक धर्मात म्हण आहे की, माझी इच्छा नव्हे तुमची इच्छा पूर्ण होवो. का? कारण ईश्वराला आपल्या जीवनात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीची माहिती असते. तो जाणतो की, खरंच आपल्यासाठी काय सर्वोत्तम आहे. उदाहरणार्थ आपण विचार करूतो की, १ कोटीची लॉटरी लागली तर खुप बरे होईल.

पण आपण हे लक्षात घेत नाही की, एवढे पैसे मिळाल्यानंतर दोन गोष्टी होऊ शकतात. आपण मोठ-मोठ्या वस्तूंच्या खरेदीत इतके गुरफटतो की आपण ईश्वराला विसरतो किंवा आपल्या सर्व मित्रांना पैशात वाटा हवा असतो. आपण पैसे न देण्यामुळे मैत्री तुटू शकते व आपण एकटे पडू शकतो म्हणून आपल्यासाठी काय चांगले आहे? हे आपण खरंच समजून घेत नाही. आपल्या मर्यादित दृष्टीकोनामुळे आपण ते मागतो जे आपल्या विचारानुसार चांगले आहे पण जर आपण हे ईश्वरावर सोडले की आपल्यासाठी जे सर्वोत्तम असेल ते त्याने द्यावा तेव्हा आपण खरी प्रार्थना करतो.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ०००१ – कॅलेंडर निर्माते डिओनसेस एक्सीगझ यांचा कॅलेंडर अनुसार पहिला ख्रिसमस साजरा करण्यात आला.
- ०५९७ – इंग्लंडने जुलियन कॅलेंडरची पद्धत स्विकारली.

### राष्ट्रीय

- १९६९ – मद्रास येथे ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या सामन्यात भारताने सर्वबाद १६३ धावा केल्या. या सामन्यात ॲशले मॉलेटने ९१ धावात ५ गडी बाद केले.
- १९७२ – पहिल्या कसोटी सामन्यात इंग्लंडने भारताला ६ गड्यांनी हरविले.


### जन्म

- १८७६ – कायदे आजम मोहम्मद अली जिन्ना यांचा जन्म.
- १९१२ – न्यूझीलंडचा क्रिकेटपटू डोनाल्ड मॅकरे याचा जन्म.
- १९१८ – मिस्रचे राष्ट्रपती अनवर अल सादात यांचा जन्म.
- १९२४ – भाजपाचे वरिष्ठ नेते व माजी भारतीय पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा जन्म.
- १९३६ – निर्माता इस्माईल मर्चंट यांचा जन्म.
- १९५६ – पाकिस्तानचा क्रिकेटपटू मन्सूर अख्तर याचा जन्म.

### निधन

- १५३० – मुगल बादशाह बाबर यांचे निधन.
- १९७७ – अभिनेता चार्ली चॅपलन यांचे निधन.
- १९९१ – पाकिस्तानचा क्रिकेटपटू महमूद हुसेन यांचे निधन.
- १९९४ – राष्ट्रपती झेल सिंग यांचे निधन.
- २००७ – प्रसिद्ध हॉलीवुड नृत्य दिग्दर्शक माइकल किड यांचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ६३



**आडवे शब्द**

१. सट्टा
४. कुणाकडे हा धनाचा असतो तर कुणाकडे गुणांचा!
६. राक्षस
७. नवविवाहितांचा श्रावणसण
१०. चटकन, त्वरित
१२. पक्ष, कड
१३. साजण, १४. जीत
१५. वर्ण, रंग
१७. विठ्ठलपत्नी
१८. बोटाइतके, छोटा तुकडा
२०. मजकुराच्या प्रती बनवणारा
२२. हिरकणीमुळे प्रसिद्धीस आलेला रायगडावरील कडा
२४. वार्ताहर
२६. शाळेत यातून 'वाटावाटी' करतात
२८. धोबी
३०. जमिनीखाली येणारे 'खोड'
३१. उत्सव
३२. संपणे
३४. निवाड्याचे ठिकाण
३६. सरावाने निष्णात
३८. वांगयाचा झणझणीत पदार्थ
४०. दुनिया
४२. नेहमी तय्यार!
४३. नृत्यकलेचे दैवत
४६. दंगामस्ती, मौज
४७. देह, शरीर
४९. ताणल्यास तुटणारे
५१. दोनवेळा म्हटल्यास फारच बडबड!, ५३. थरथर
५५. अतर्क्य घटना
५७. धोकादायक (हिंदी)
५९. जेव्हा (संस्कृत)
६१. नट पिळण्याचे साधन
६२. घनघोर युद्ध
६३. डाळीचे कालवण
६४. प्राण्यांचे शस्त्र
६६. वन्य, रानटी
६९. आजीची आजी
७३. कडक व चिवट
७४. धनी
७६. वागणूक
७७. कथेचा गोषवारा
७८. गीत
७९. वाटप
८०. माकडीण
८१. राजकीय आखाड्यात कांदेपोह्याशी टक्कर घेणारा पदार्थ

**उभे शब्द**

२. तीट
३. आवाज
४. कोळशाची पूड
५. अपात्र
६. नशीबवान
७. कबूल, संमत
८. भाद्रपदात माहेरी येणाऱ्या ज्येष्ठा-कनिष्ठा
९. चेहऱ्यावरील तेज
११. मान ठेवणे, आदर करणे
१४. जनक राजाची मुलगी, सीता
१६. नूतन
१७अ. 'आला --- समिंदर, त्याला नाही धीर' (ज्योत्सना भोळे यांचे गाजलेले गीत)
१८. बकरा
१९. पूजाअर्चा सांगणारा ब्राह्मण
२०अ. स्थूल
२१. या दोन वेळा चुकवू नयेत अशी जगरहाटी आहे
२३. मला
२४. दूरचा नातेसंबंध
२५. सेवक
२७. श्रीकृष्णाचे वाद्य
२९. लेंगा
३०. श्रीकृष्णाचा मामा
३३. रत्न (हिंदी)
३५. वाहन
३७. बोबडी वळणे
३८. रमताराम
३९. चांदणी
४१. शिडाचे जहाज
४४. ताणलेल्या दोरीचा अवाज
४५. सोन्याचा धागा
४६. पकड!
४८. विनंती, मागणी
५०. अधिकउणे ताकद (हिंदी)
५२. करा घेऊन मिरवणारी
५३. बांगडी, कडे
५४. डोळा
५६. उन्हाची तीव्रता
५८. तमाशातील रूपवती
६०. येऊन पोहोचणे
६१. दूर गेलेला, वंचित
६५. भयानक, भयंकर
६६. पोटातील कृमी
६७. किल्लेदार
६८. नाहकच 'एकाक्ष' म्हणून ओळखला जाणारा पक्षी
७०. डोंगर
७१. वाचन, पारायण
७२. आयुष्य
७३. चणचण
७४. माणूस
७५. सततची मागणी, हट्ट
७८. खेडे, वस्ती

**शब्दकोडे क्र. ६२ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.फयान ४.पदरमोड ८.नवरा १०.चमत्कार ११.हातचलाखी १३.रक्षक १४.वासना १५.रामा १६.वारा १७.रान १८.काया २०.गो २१.तरुणी २२.टीकाकार २५.रतन २७.मळमळ २८.जस्त ३०.नामदार ३२.जळवात ३४.मनन ३६.वाचा ३८.पाया ३९.फारकत ४०.रत ४२.कपाळ ४३.जननमरण ४५.मस्त ४७.नगर ४८.तप ५०.तग ५१.स्तवनीय ५३.आळ ५४.तबक ५६.कथानक ५८.नायनाट ५९.सरकार ६२.उपकार ६३.बलक ६५.विळी ६६.परात ६७.दमदाटी ६९.बटन ७०.आभार ७२.तडकसार ७३अ.जग ७४.वसाहत ७४अ.फरीदा ७५.कणीदार

उभे उत्तर : १.सनसनाटी २.याचक ३.नम ४.परवानगी ५.रचनाकार ६.डहाळी ७.कचरा ८.नखी ९.राजाराणी ९अ.घरघंटी १२.लामा १६.वारुळ १९.यातना २१.तमस २३.काजळ २४.रजत २६.नमस्कार २७.मरवा २९.जनक ३१.छाया ३२.जळजळ ३३.वाहनतळ ३४.मरणयातना ३५.नतमस्तक ३७.चाकरचुकर ३८.पाळत ३९.फार ४१.तनय ४४.मग ४६.स्तव ४९.पदक ५२.नीरस ५३.आपपरभाव ५५.बटबटीत ५७.नजरानजर ५८.नारद ६०.रविवार ६१.काळी ६४.कथेकरी ६६.पट ६८.मदत ६९.बरणी ७१.रसा ७२अ.डफ ७३.सादा

# कोरठण खंडोबा देवस्थानच्या वार्षिक यात्रोत्सवाची जय्यत तयारी

**विविध विभागांची प्रशासकीय बैठक संपन्न**

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



पिंपळगाव रोठा (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) राज्यस्तरीय 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा प्राप्त श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थानाचा वार्षिक यात्रोत्सव यंदा ३ ते ५ जानेवारी २०२६ दरम्यान भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. जिल्ह्यात नववर्षाच्या सुरुवातीला होणारा हा सर्वात मोठा यात्रोत्सव मानला जातो. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या देवस्थानाच्या यात्रेच्या नियोजनासाठी विविध विभागांची महत्त्वाची प्रशासकीय बैठक मंगळवार दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी देवस्थान जवळ पार पडली.

देवस्थानच्या अध्यक्षा शालिनीताई घुले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत पोलीस, आरोग्य, बांधकाम, महावितरण, एसटी महामंडळ, जीवन प्राधिकरण आणि कृषी विभागांच्या अधिकाऱ्यांनी भाग घेतला. यात्रेकाळात भाविकांच्या सोयी-सुविधा, वीजपुरवठा, पाणी व्यवस्था, आरोग्य सेवा, वाहतूक नियंत्रण आणि सुरक्षा व्यवस्था याबाबत सविस्तर चर्चा झाली. तहसीलदार गायत्री सौंदाणे यांनी विविध विभागांना स्पष्ट सूचना दिल्या, जेणेकरून यात्रोत्सव शांततेत आणि सुरळीत पार पडेल. बैठकीस माजी अध्यक्ष ॲड. पांडुरंग गायकवाड, पारनेर पोलीस निरीक्षक संतोष खेडकर, उपाध्यक्ष महेश शिरोळे, माजी सरपंच अशोक घुले, सरपंच सुरेखा वाळुंज, सचिव चंद्रभान ठुबे, जालिंदर खोसे, भाऊसाहेब गाडगे, साहेबराव वाफारे, पत्रकार गोरक्ष मदने, गोपीनाथ घुले, किरण शेलार, रामदास मुळे, रवींद्र राजदेव, संतोष वाळुंज, प्रशांत घुले, सौरभ क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते.

कोरठण खंडोबा यात्रा राज्यभरातील भाविकांना आकर्षित करणारी असून, मानाच्या काठ्या, पालखी मिरवणुका आणि धार्मिक कार्यक्रम यामुळे ती विशेष वैशिष्ट्यपूर्ण ठरते. देवस्थान ट्रस्टच्या वतीने यात्रेच्या तयारीला अंतिम स्वरूप देण्यात येत असून, भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**राज्यभरातील भाविकांचे**

कोरठण खंडोबा हे कुलदैवत आहे. तीन दिवसीय चालणा-या यात्रोत्सवात मोठ्या संख्येत भाविक येतात. प्रशासनाच्या वतीने यात्रा उत्सवाची तयारी सुरू आहे. सर्व प्रशासकीय विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत. **- गायत्री सौंदाणे (तहसीलदार, पारनेर)**

देवस्थान समिती व प्रशासकीय विभागाच्या माध्यमातून यात्रा उत्सवाची तयारी जोरात सुरू आहे. यात्रा उत्सव काळात विविध धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने यात्रा उत्सव काळात उपस्थित राहावे.

**- शालिनी घुले (अध्यक्षा कोरठण खंडोबा देवस्थान)**

# वैदू समाजाचा झाला पहिला नगरसेवक

**ॲड. बाळासाहेब प्रकाश आंबेडकरांनी केला सत्कार**

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



कंधार नगरपरिषद निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार दिलीप संतराम देशमुख यांनी दणदणीत विजय मिळवला आहे. गेल्या ५० वर्षांतील वैदू समाजाचे पहिले नगरसेवक होण्याचा बहुमान त्यांना मिळाला असून त्याचे विशेष कौतुक आणि अभिनंदन करून दिलीप देशमुख यांचा वंचित बहुजन आघाडीचे सर्वस्वा अँड. बाळासाहेब आंबेडकरांनी नांदेड येथे त्यांचा यथोचित सत्कार केला. या वेळी वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. कंधार येथील वैदू समाजाचे प्रतिनिधी आणि वंचित बहुजन आघाडीचे नवनिर्वाचित नगरसेवक दिलीप संतराम देशमुख यांनी दणदणीत विजय मिळवल्याने वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.बाळासाहेब प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान बाळासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते दिलीप देशमुख यांचा विशेष सत्कार करण्यात आला आणि त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. "समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सत्तेचे लाभ पोहोचवीने हीच वंचित बहुजन आघाडीची भूमिका असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. भटक्या-विमुक्त समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचे डॉ.बाळासाहेब आंबेडकरांचे स्वप्न कंधार येथील न.पा.निवडणुकीत सत्यात उतरले आहे. कंधार नगरपरिषद निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार दिलीप संतराम देशमुख यांनी दणदणीत विजय मिळवला असल्याने त्यांचे सर्वसामाजातून अभिनंदन केल्या जात आहे.

# शिवाजीराव नाईकवाडी मामा यांना वाढदिवसानिमित्त विविध मान्यवरांच्या शुभेच्छा!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे नेते तथा प्रगतशील शेतकरी शिवाजीराव नाईकवाडी (मामा) यांना वाढदिवसानिमित्त विविध मान्यवरांनी सदिच्छा भेट देत शुभेच्छांचा वर्षाव केला.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी त्यांचा साईबाबा मूर्ती, शाल, पुष्पगुच्छ, खारीक, खोबरे हार तसेच पेढे भरवून त्यांचा सन्मान केला. यावेळी दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, एल.आय.सी. सल्लागार अधिकारी अर्जुन पाडेकर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

तसेच अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तथा शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष अमितराव भांगरे, माजी जिल्हा परिषद सदस्य तथा ओबीसी नेते बाजीराव दराडे यांनीही नाईकवाडी मामा यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिवाजीराव नाईकवाडी मामा यांच्या सामाजिक, राजकीय व कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल गौरवोद्गार काढत त्यांच्या दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.



# शेतातील सोलार पंप च्या प्लेटाची नासधूस

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

हदगांव तालुक्यातील तामसा शिवारात माजित खान पठाण यांच्या शेतातील सोलार पम्प च्या सौर ऊर्जेच्या प्लेट अज्ञात व्यक्तीनी नासधूस करून फोडल्या. तामसा शिवारात शेत गट क्र. ४८३ शेतातील बसवलेल्या सोलार पम्प च्या सौर ऊर्जेच्या प्लेटा अज्ञात व्यक्तीने तोडफोड करून नासधूस केल्या प्रकरणी तामसा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध तक्रार देण्यात आली आहे.

# अपघात टाळण्यासाठी रस्ते तातडीने दुरुस्त करा : राहुल शिंदे

## वाळवणे, धाडगेवाडी, घोडकेवाडी मार्गांची दयनीय अवस्था; भाजपा पदाधिकाऱ्यांचे निवेदन

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



पारनेर तालुक्यातील रांजणगाव ते वाळवणे, रांजणगाव ते धाडगेवाडी आणि रांजणगाव ते घोडके वाडी या तीन प्रमुख रस्त्यांची अतिशय दुरावस्था झाली आहे. या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून, वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे वारंवार अपघात होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. या रस्त्यांची त्वरित दुरुस्ती करण्यात यावी, अशी आग्रही मागणी भारतीय जनता पार्टीच्या पारनेर तालुका अध्यक्ष राहुल पाटील शिंदे यांनी केली आहे.

राहुल पाटील शिंदे यांनी या संदर्भात पारनेर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांना निवेदन सादर केले. निवेदनात त्यांनी नमूद केले की, हे रस्ते तालुक्यातील अनेक गावांना जोडणारे महत्त्वाचे मार्ग आहेत. खड्ड्यांमुळे दुचाकीस्वार आणि शालेय विद्यार्थ्यांना विशेषतः धोका निर्माण झाला आहे. अपघातांच्या वाढत्या घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. तिन्ही रस्त्यांचे डांबरीकरण किंवा डागडुजीचे काम तातडीने सुरू करण्यात यावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

यावेळी राहुल पाटील शिंदे यांच्यासमवेत सुपा गावचे माजी उपसरपंच दत्तानाना पवार, महेश देशमुख, पंजाबराव देशमुख आदी भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. पारनेर तालुक्यात रस्ते विकासाच्या मुद्द्यावर भाजपा सातत्याने आवाज उठवत असून, यापूर्वीही अनेक रस्त्यांसाठी निधी मंजुरी आणि कामे मार्गी लावण्यात राहुल शिंदे यांचा मोलाचा वाटा आहे.

तालुक्यातील नागरिकांनीही या मागणीला पाठिंबा दिला आहे. रस्ते दुरुस्त न झाल्यास वाहतूक आणि दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम होईल, असे मत व्यक्त होत आहे.

या तिन्ही रस्त्यांची त्वरित दुरुस्ती करावी. विकास हा जनतेचा हक्क आहे आणि तो कोणत्याही परिस्थितीत थांबू नये. आम्ही जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी सदैव तत्पर आहोत, आणि रस्ते चांगले झाल्यास तालुक्याचा खरा विकास होईल.

**- राहुल पाटील शिंदे**
**भारतीय जनता पार्टी, पारनेर तालुका अध्यक्ष**

# गणोरे केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव निपाणीची उत्तुंग भरारी

**विविध सांघिक व वैयक्तिक स्पर्धांत घवघवीत यश!**

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव निपाणी येथे संपन्न झालेल्या गणोरे केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत पिंपळगाव निपाणी शाळेच्या विद्यार्थ्यांनी सांघिक व वैयक्तिक स्पर्धांमध्ये घवघवीत यश संपादन करत शाळेची उत्तुंग भरारी घेतली आहे. कबड्डी व खो-खो या सांघिक खेळांमध्ये मोठ्या गटातील मुले व मुलींनी प्रथम क्रमांक मिळवत तालुका निवडीत स्थान मिळवले, तसेच खो-खो लहान गटातही मुले व मुलींनी प्रथम क्रमांक पटकावला. कबड्डी लहान गटात मुलींनी प्रथम, तर मुलांनी द्वितीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली.

वैयक्तिक स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कौशल्य दाखवले. १०० मीटर धावण्यात मोठ्या गटात मुलींमध्ये दिशा संदीप उघडे हिने प्रथम क्रमांक मिळवत तालुका निवड मिळवली, तर मुलांमध्ये वेदांत विरेंद्र मुर्तडक याने द्वितीय क्रमांक पटकावला. ५० मीटर धावण्यात लहान गटात अमोल भोमा मेंगाळ याने द्वितीय क्रमांक मिळवला. लांब उडीत मोठ्या गटात नितेश अविनाश गोर्डे (मुले) व नीलम सोमनाथ शिंगवे (मुली) यांनी प्रथम क्रमांक मिळवला, तर लहान गटात ग्रंथा गणपत तोरमल (मुली) प्रथम व अरमान अब्दुल शेख (मुले) द्वितीय क्रमांकावर राहिले. उंच उडीत मोठ्या गटात कृष्णा राहुल गोरडे (मुले) व नीलम सोमनाथ शिंगवे (मुली) यांनी प्रथम क्रमांक मिळवला, तर लहान गटात सिराज शेख याने तृतीय व श्रेया योगेश वाकचौरे हिने द्वितीय क्रमांक पटकावला. थाळी फेकीत मोठ्या गटात नितेश अविनाश गोर्डे (मुले) व नीलम सोमनाथ शिंगवे (मुली) यांनी प्रथम क्रमांक मिळवला, तर गोळा फेकीत प्रतिक दत्तात्रय महाले (मुले) व पिहु लक्ष्मण गाजरे (मुली) यांनी प्रथम क्रमांक पटकावत यशाची परंपरा कायम राखली. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे जिल्हा परिषदचे गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, देवठाण बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी अनिल गायकवाड, गणोरे केंद्राचे केंद्रप्रमुख सुनील घुले यांनी अभिनंदन केले. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन तोरमल, उपाध्यक्ष अनिल वाकचौरे, सदस्य गणपत तोरमल, शरद गोरडे, पिंपळगाव निपाणीचे पोलीस पाटील संतोष वाकचौरे, उपसरपंच शांताराम वाकचौरे, विक्रांत वाकचौरे, विक्रम तोरमल, तुकाराम वाकचौरे तसेच सर्व संस्थेचे पदाधिकारी, पालक व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील तालुका व जिल्हास्तरीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचा पाठिंबा यामुळे हे यश मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# HDFC बँकेने CSR रिपोर्टची आवृत्ती केली प्रसिद्ध

**मुंबई: (समर्थ गांवकरी)**

HDFC बँक या भारताच्या सर्वात मोठ्या खाजगी क्षेत्रातील बँकेने आज आपला पहिलावहिला स्वतंत्र CSR रिपोर्ट प्रसिद्ध केल्याचे जाहीर केले आहे. या अहवालात आपल्या 'परिवर्तन' या अंब्रेला प्रोग्रामच्या माध्यमातून बँकेने केलेला सामाजिक प्रभावाचा एक दशकाचा प्रवास दर्शविला आहे. बँकेने 2024-25 या आर्थिक वर्षात आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) उपक्रमांवर 1,068.03 कोटी रु. खर्च केल्याचे नमूद केले आहे. गेल्या वर्षापेक्षा हा खर्च सुमारे 123 कोटी रु. जास्त आहे. एकत्रितपणे, 31 मार्च 2025 रोजी बँकेने 6,176 कोटी रु. CSR प्रोग्राममध्ये गुंतवले आहेत. गेले वर्ष हे 'परिवर्तन' चे दहावे वर्ष होते. या उपक्रमाच्या अंतर्गत HDFC बँकेने 28 राज्ये आणि 8 केंद्रशासित प्रदेशांत मिळून 10.56 कोटी लोकांच्या जीवनाला स्पर्श केला आहे.

# गर्दनी येथील कै. गं. भा. अंजनाबाई सिताराम नाईकवाडी यांचे निधन; २७ डिसेंबर रोजी दशक्रिया विधी!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**




गर्दनी (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) गर्दनी गावच्या ज्येष्ठ व आदरणीय कै. गं. भा. अंजनाबाई सिताराम नाईकवाडी यांचे दिनांक 18 डिसेंबर 2025 रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने नाईकवाडी परिवारासह संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

"सहवास जरी सुटला तरी, स्मृती सुगंध देत राहील; आयुष्याच्या प्रत्येक वळणावर, तुमची आठवण येत राहील..." अशा शब्दांत कुटुंबीयांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

कै. अंजनाबाई नाईकवाडी यांच्या दशक्रिया विधीचा कार्यक्रम शनिवार, 27 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 8.00 वाजता आयोजित करण्यात आला आहे. या विधीप्रसंगी ह.भ.प. राजेंद्र महाराज नवले (तांभोळ) यांचे प्रवचन होणार आहे. त्यांच्या पश्चात मुलगे, मुली, नातवंडे, पुतणे-पुतण्या असा मोठा आप्तपरिवार आहे. शोकाकुल नातेवाईकांमध्ये श्री. भाऊसाहेब सिताराम नाईकवाडी, श्री. रावसाहेब सिताराम नाईकवाडी, सौ. मिराबाई पंढरीनाथ शेटे, सौ. हिराबाई सिताराम नाईकवाडी, सौ. अलका बाळासाहेब घोडके, श्री. परबतराव नामदेव नाईकवाडी, श्री. नारायण मुरलीधर नाईकवाडी, श्री. निवृत्ती नामदेव नाईकवाडी, श्री. शिवाजी नामदेव नाईकवाडी, श्री. विठ्ठल मुरलीधर नाईकवाडी यांच्यासह समस्त नाईकवाडी परिवार, नातेवाईक व गर्दनी गावातील ग्रामस्थांचा समावेश आहे.

कै. अंजनाबाई नाईकवाडी यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून न येणारी असून, त्यांच्या आठवणी सदैव स्मरणात राहतील.

# पत्रकार शेख आरिफ यांना आदर्श पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**



नायगाव तालुक्यातील पत्रकार क्षेत्रात अधिक वर्तमानातून सर्वच विषय अतिशय व्यवस्थितपणे हाताळून सर्वसामान्यांना न्याय देण्याची भूमिका बजावत जनतेसमोर एक आदर्श पत्रकारिता ठेवली आहे म्हणून मौजे मांजरम येथे होत असलेल्या सहाव्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे मुख्य संयोजक जीवन मांजरमकर यांनी ज्येष्ठ पत्रकार शेख आरिफ यांना आदर्श पत्रकारिता युवा जीवन गौरव पुरस्कार जाहीर केला आहे. नायगाव तालुक्यातील मौजे मांजरम येथे शिव जन्मोत्सव निमित्त सहावे जनसंवाद साहित्य संमेलन होणार असून या संमेलनात अनेक साहित्यिक विचारवंत कवी यांची उपस्थिती राहणार आहे तर विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तीचे पुरस्कार देखील जाहीर करण्यात आले आहेत याच अणुषंगाने सम्मेलनाचे मुख्य संयोजक जीवन मांजरमकर यांनी ज्येष्ठ पत्रकार शेख आरिफ रसूलसाब यांना आदर्श पत्रकारिता युवा जीवन गौरव पुरस्काराची घोषणा केली सदर पुरस्कार साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते वितरित केला जाणार आहे असेही संयोजकांनी कळविले आहे. या जाहीर झालेल्या पुरस्काराबद्दल ज्येष्ठ पत्रकार शेख आरिफ यांचे सर्व स्तरातून व मित्रपरिवार यांनी अभिनंदन केले जात आहे.

# विक्रम घोरपडेची माळेगाव केसरी कुस्ती मैदानात चमकदार कामगिरी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**




माळेगाव यात्रेनिमित्त वीर नागोजी नाईक कुस्ती मैदानात आयोजित भव्य कुस्ती स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील भगतवाडी येथील विक्रम शंकर घोरपडे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत माळेगाव केसरीचा मान पटकावला. विजेते विक्रम घोरपडे यांना रोख ५१ हजार रुपये, मानाचा फेटा, शाल, श्रीफळ, गदा व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत आबू चाऊस हे उपविजेते ठरले. त्यांना ५ हजार रुपये प्रोत्साहनपर बक्षीस, हार, शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे ४१ हजार रुपयांचे बक्षीस चार मल्लांना विभागून, तर तृतीय क्रमांकाचे ३१ हजार रुपयांचे बक्षीसही चार मल्लांना विभागून देण्यात आले. या सर्व विजेत्यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. विक्रम घोरपडे व आबू चाऊस यांच्यातील अंतिम कुस्ती सुमारे एक तास रंगली. दोन्ही मल्लांनी सादर केलेल्या विविध डावपेचांचा आनंद घेण्यासाठी कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. ही कुस्ती स्पर्धा लोहा पंचायत समितीच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी गटविकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी, विस्तार अधिकारी धनंजय देशपांडे, रोहिदास टेंभुर्णी, मोहन मेहत्री, श्रीराम झपाठक, घोडके व शेख रसूल यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परशुराम कौशल्य यांनी केले.

माळेगावच्या कुस्ती मैदानात दैवयानी मानेने पुरुष मल्लाला केले पराभूत माळेगावच्या कुस्ती मैदानात झालेल्या कुस्त्यांमध्ये दारव्हा तालुका, दिग्रस जि. यवतमाळ येथील दैवयानी वासुदेव माने हिने पुरुष कुस्तीगीराला पराभूत करत दोन हजार रुपयांची कुस्ती जिंकून उपस्थितांची मने जिंकली. दिल्ली येथून आलेल्या एका महिला कुस्तीगीराचीही कुस्ती माळेगावात लागली होती.

दैवयानी माने ही दारव्हा येथील रहिवासी असून सध्या ती बारावी मध्ये शिक्षण घेत आहे. शिक्षणासोबतच कुस्ती या खेळात ती सातत्याने प्रगती करत आहे. मराठवाडा, विदर्भ, आंध्र प्रदेश, तेलंगणा व कर्नाटक या राज्यांमध्ये तिने कुस्ती खेळली असून अनेक ठिकाणी प्रथम क्रमांक मिळवण्याची उल्लेखनीय कामगिरी तिने केली आहे. शालेय स्तरापासून ते राज्यस्तरापर्यंत तिने यश संपादन केले आहे.

**कुस्तीची आवड आयुष्यभराची**

माळेगाव यात्रेतील कुस्ती पाहण्यासाठी वाघदरा ता. गंगाखेड जि. परभणी येथील भगवान भानुजी सापत वय ७६ यांनी खास उपस्थिती लावली होती. त्यानी तब्बल ३५ वर्षे कुस्ती खेळली आहे. सध्या वयोमानामुळे कुस्ती खेळता येत नसली तरी कुस्तीची प्रचंड आवड असल्याने माळेगावसह अनेक ठिकाणी ते कुस्ती पाहण्यासाठी जात असल्याचे त्यांनी सांगितले.

मागील अडीच वर्षांपासून ती नियमितपणे विविध कुस्ती स्पर्धांमध्ये सहभाग घेत आहे. परभणी येथील राजे संभाजी आखाड्यातील प्रशिक्षक अण्णा डिगोळे यांचे तिला मार्गदर्शन लाभत आहे.

दैवयानीचे वडील वासुदेव माने हे स्वतः मल्ल असून वडिलांकडूनच तिने कुस्तीतील अनेक डावपेच आत्मसात केले आहेत. दैवयानी दररोज सकाळी दोन तास व रात्री दोन तास नियमित सराव करते. अभ्यास आणि खेळ यांचा समतोल साधत ती आपली वाटचाल करत आहे. यावेळी बोलताना दैवयानी माने म्हणाली, आजच्या युगात मुलींनी विविध खेळांमध्ये सहभागी झाले पाहिजे. कुस्ती, कराटे यासारखे खेळ आत्मसात करणे आवश्यक आहे. स्वतःच्या सुरक्षेसाठी मुलींनी सक्षम बनले पाहिजे. मुलगा व मुलगी यात काहीही फरक नाही. अनेक क्षेत्रांत मुली मुलांपेक्षा पुढे जात आहेत.

# बार असोसिएशनच्या जिल्हाध्यक्षपदी ॲड. कृष्णा झावरे

## उपाध्यक्षपदी ॲड. भाऊसाहेब घुले : जिल्हा न्यायालय परिसरात गुलाल, पेढ्यांचा जल्लोष

**नगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा न्यायालयातील अहमदनगर बार असोसिएशनच्या २०२६ वर्षासाठी झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी ॲड. कृष्णा झावरे तर उपाध्यक्षपदी ॲड. भाऊसाहेब घुले यांनी निर्णायक विजय मिळवला. मंगळवारी पार पडलेल्या या निवडणुकीत मतदानानंतर रात्री उशिरापर्यंत मतमोजणी सुरू होती. निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. लक्ष्मण गोरे यांनी अंतिम निकाल जाहीर केला. निकाल जाहीर होताच न्यायालय परिसरात गुलालाची उधळण, पेढ्यांचे वाटप करत वकिलांनी जल्लोषात विजयोत्सव साजरा केला.



बार असोसिएशनच्या वार्षिक निवडणुकीसाठी एकूण १ हजार ८६१ वकिल मतदारांपैकी १ हजार १५७ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. यापूर्वी सचिवपदी ॲड. विनोद शेटे व खजिनदारपदी ॲड. वसीम खान यांची बिनविरोध निवड झाली होती.अध्यक्षपदाची चौरंगी लढत अध्यक्षपदासाठी झालेल्या चौरंगी निवडणुकीत ॲड. कृष्णा झावरे यांनी ५६३ मते मिळवून १८३ मतांनी विजय मिळवला. त्यांचे प्रतिस्पर्धी ॲड. सुनील भागवत (३८०), ॲड. सुरेश लगड (१३०) व ॲड. संदीप काळे (७४) यांना पराभव स्वीकारावा लागला.

उपाध्यक्षपदासाठी ॲड. भाऊसाहेब घुले यांनी ६८६ मते मिळवत ॲड. स्वाती पाटील (४३८) यांच्यावर २४८ मतांनी मात केली.सहसचिव व कार्यकारिणी निवड महिला सहसचिवपदी ॲड. सारिका झरेकर यांनी ६११ मते मिळवून ॲड. करुणा शिंदे (५१६) यांचा पराभव केला. पुरुष सहसचिवपदी ॲड. अमोल अकोलकर ४५३ मते घेऊन विजयी झाले; ॲड. सारस क्षेत्रे (३४०) व ॲड. रामेश्वर कराळे (३२३) यांना पराभव पत्करावा लागला.

पुरुष कार्यकारिणी सदस्य म्हणून ॲड. अजिनाथ कर्डीले (७९२), ॲड. महेश कोतकर (७३४), ॲड. अक्षय म्हस्के (७१५), ॲड. शिवाजी शिंदे (६९२), ॲड. ज्ञानदेव दाते (६६१) व ॲड. प्रमोद खामकर (५६०) हे निवडून आले.

महिला राखीव कार्यकारिणी सदस्यपदी ॲड. प्राजक्ता करांडे यांनी ६२४ मते मिळवून विजय संपादन केला.

### नूतन कार्यकारिणी जाहीर

निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. लक्ष्मण गोरे व सहाय्यक निर्णय अधिकारी ॲड. प्रभाकर शहाणे यांनी जाहीर केलेली अंतिम कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : अध्यक्ष : ॲड. कृष्णा झावरे, उपाध्यक्ष : ॲड. भाऊसाहेब घुले, सचिव : ॲड. विनोद शेटे, खजिनदार : ॲड. वसीम खान, सहसचिव : ॲड. अमोल अकोलकर, महिला सहसचिव : ॲड. सारिका झरेकर, कार्यकारिणी सदस्य –ॲड. महेश कोतकर, ॲड. अक्षय म्हस्के, ॲड. अजिनाथ कर्डीले, ॲड. शिवाजी शिंदे, ॲड. ज्ञानदेव दाते, ॲड. प्रमोद खामकर व ॲड. प्राजक्ता करांडे.

# शापूरजी पल्लोनजी रियल एस्टेटने १०५ एकरांच्या प्रकल्पासह प्लॉटेड डेव्हलपमेंटमध्ये प्रवेश केला

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील विश्वासार्ह रिअल इस्टेट विकासकांपैकी एक असलेल्या शापूरजी पल्लोनजी रियल एस्टेट (SPRE) ने आज पुणे ग्रोथ कॉरिडोरमध्ये 105 एकरांवरील प्रीमियम प्लॉटेड प्रकल्प 'ट्रीटोपिया'च्या माध्यमातून प्लॉटेड डेव्हलपमेंट क्षेत्रात प्रवेश केल्याची घोषणा केली. या प्रकल्पातून सुमारे ₹600 कोटींच्या महसूलाची अपेक्षा आहे. आगामी पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ, प्रस्तावित आयटी पार्क तसेच प्रस्तावित इनर आणि आउटर रिंग रोड्सजवळ स्थित असलेला हा प्रकल्प, प्लॉटेड डेव्हलपमेंटसाठी वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर SPRE च्या निवासी पोर्टफोलिओचा धोरणात्मक विस्तार आहे. या प्रकल्पात 2,000 ते 6,000 चौ.फुट क्षेत्रफळाच्या




483 नियोजनबद्ध निवासी प्लॉट्सचा समावेश असेल, जे अंतिम ग्राहक आणि दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी डिझाइन करण्यात आले आहेत. कमी घनतेचा आणि निसर्गाधारित विकास म्हणून डिझाइन करण्यात आलेल्या या प्रकल्पात सुमारे 70 टक्के क्षेत्र मोकळ्या व हिरवळीच्या जागांसाठी राखीव आहे. सुमारे 600 एकर जंगल क्षेत्राने वेढलेला हा प्रकल्प स्वच्छ हवा आणि निसर्गसंपन्न वातावरण प्रदान करतो.

या प्रकल्पात सुमारे 3 एकरांचा क्लब हाऊस, सुमारे 25 एकरांचा तलाव, सुमारे 1.5 किमी लांबीचा लेकसाइड प्रोमेनेड आणि 35 पेक्षा अधिक जागतिक दर्जाच्या सुविधा असतील. यामध्ये धरण, बार्बेक्यू झोन्स तसेच विविध मनोरंजन आणि वेलनेस सुविधा समाविष्ट आहेत. 18 मीटर रुंद, वृक्षराजीने सजलेला सेंट्रल अव्हेन्यू सर्व निवासी प्लॉट्सना सामायिक सुविधांशी जोडेल. प्रकल्पाच्या लॉन्चवेळी प्रतिक्रिया देताना, शापूरजी पल्लोनजी रियल एस्टेटचे सीईओ श्री. सुमित सप्रू म्हणाले, "पुणे ग्रोथ कॉरिडोर सुधारित कनेक्टिव्हिटी आणि वाढत्या निवासी मागणीमुळे एक महत्त्वाचा इन्फ्रास्ट्रक्चर-आधारित बाजार म्हणून उदयास येत आहे. प्लॉटेड डेव्हलपमेंटबाबत घरखरेदीदारांमध्ये वाढती रुची पाहता, ट्रीटोपिया हा आमच्या निवासी पोर्टफोलिओसाठी महत्त्वाचा टप्पा आहे."

# उद्योजक मेळावा यशस्वीपणे संपन्न

**नवी मुंबई: (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र चेंबर कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चर (MACCIA) चे कमिटी मेंबर आणि ठाणे जिल्हा होलसेल व्यापारी वेल्फेअर महासंघचे अध्यक्ष श्री सुरेश भाई ठक्कर यांनी सांगितले की या मेळाव्यास महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर (MACCIA) चे अ *ध्यक्ष श्री. रवींद्र माणगावे यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी उद्योजकता विकासावर मार्गदर्शन करताना गाव तिथे उद्योजक' या संकल्पनेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर उद्योगनिर्मिती, रोजगारनिर्मिती आणि स्वावलंबनाचे महत्त्व अधोरेखित केले. स्थानिक संसाधनांचा योग्य वापर करून प्रत्येक गावात सक्षम उद्योजक घडविणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.




तसेच नवी मुंबई को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडचे अध्यक्ष सीए श्री. बजरंग सावंत तसेच उपाध्यक्ष श्री. कृष्णकांत शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या कार्यक्रमास MACCIA चे जी.सी. मेंबर सीए श्री. किरण भोसले यांच्यासह संस्थेचे अनेक पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच विविध उद्योग, सेवा व व्यापार क्षेत्रातील उद्योजकांनी या मेळाव्यात सक्रिय सहभाग नोंदवला. उद्योजकांना प्रत्यक्ष मार्गदर्शन, नेटवर्किंगची संधी तसेच बँकिंग व संस्थात्मक पातळीवरील योजनांची सविस्तर माहिती मिळाल्यामुळे हा उद्योजक मेळावा अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.




# दिल्ली आणि गुवाहाटी येथे कोक स्टुडिओ भारत लाइव्हचे आयोजन

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

कोका-कोला उल्लेखनीय सांस्कृतिक क्षणांचा अनुभव देण्यास सज्ज आहे, जेथे नववर्षात जानेवारीमध्ये पहिल्यांदाच सर्वांसमोर कोक स्टुडिओ भारत लाइव्हचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा जानेवारीमध्ये दिल्ली व गुवाहाटीमधील कोक स्टुडिओ भारतच्या चाहत्यांना नवीन फॉर्मेटचा अभूतपूर्व अनुभव मिळणार आहे, ज्यामध्ये संगीत, फूड आणि सांस्कृतिक वारसाचे संयोजन पाहायला मिळेल.

# बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ ट्रॉफी चेन्नईमध्ये दाखल

**चेन्नई : (समर्थ गांवकरी)**

व्यावसायिक सायकलिंगमधील भारताच्या वाढत्या प्रतिष्ठेचे एक शक्तिशाली प्रतीक असलेली, प्रतिष्ठित आणि वारसा-प्रेरित बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ ची ट्रॉफी आज चेन्नई येथील एका विशेष समारंभात अनावरण करण्यात आली. या ट्रॉफी टूर कार्यक्रमाला तामिळनाडू सरकारचे युवा कल्याण आणि क्रीडा विकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव थिरू डॉ. अतुल्य मिश्रा, आयएएस; तामिळनाडू क्रीडा विकास प्राधिकरणाचे सदस्य सचिव आणि मुख्य कार्यकारी अधिकारी थिरू जे मेघनाथन रेड्डी, आयएएस; मायलापूरचे विधानसभेचे सदस्य थिरू धा वेलू; तामिळनाडू सायकलिंग असोसिएशनचे अध्यक्ष थिरू एम सुधाकर; आणि तामिळनाडू क्रीडा विकास प्राधिकरणाच्या




महाव्यवस्थापिका श्रीमती एल सुजाता आणि बजाज पुणे ग्रँड टूरचे शर्यत तांत्रिक संचालक थिरू पिनाकी बायसॅक यांच्यासह वरिष्ठ सरकारी आणि क्रीडा मान्यवरांची उपस्थिती लाभली.

श्री. जितेंद्र दुडी (आयएएस) यांच्या नेतृत्वाखाली पुणे जिल्हा प्रशासनाने, महाराष्ट्र सरकारच्या खंबीर पाठिंब्याने आयोजित केलेली, बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ ही भारतातील प्रमुख आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धा आणि देशातील पहिली UCI २.२ वर्गीकृत रोड शर्यत आहे. ही शर्यत जगभरातील उच्चभ्रू सायकलपटूंना भारतीय रस्त्यांवर स्पर्धा करण्यासाठी आणेल, ज्यामुळे भारत जागतिक व्यावसायिक सायकलिंगच्या नकाशावर ठामपणे स्थापित होईल.

देशव्यापी ट्रॉफी टूरचा एक भाग म्हणून, चेन्नईमध्ये बजाज पुणे ग्रँड टूर ट्रॉफीचे अनावरण हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे, जो भारताची वाढती क्रीडा महत्त्वाकांक्षा आणि जागतिक दर्जाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजित करण्याची क्षमता दर्शवतो. ट्रॉफी टूरच्या चेन्नईमधील थांब्यामुळे शहराची खोलवर रुजलेली क्रीडा संस्कृती आणि भारताच्या सायकलिंगचे भविष्य घडवण्यात तिची वाढती भूमिका अधोरेखित होते. पुण्यातील प्रसिद्ध तांबट आळीच्या तांब्याच्या कारागिरांनी तयार केलेली, बजाज पुणे ग्रँड टूर ट्रॉफी महाराष्ट्राच्या समृद्ध वारशातून प्रेरणा घेते, जी आठ ऐतिहासिक किल्ल्यांचे आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या चिरस्थायी वारशाचे प्रतीक आहे. या ट्रॉफीने देशभरातील सायकलिंग उत्साही, क्रीडा प्रशासक आणि व्यापक क्रीडा समुदायामध्ये आधीच उत्साह निर्माण केला आहे. बजाज पुणे ग्रँड टूरचे रेस टेक्निकल डायरेक्टर पिनाकी बायसॅक म्हणाले, "पुणे ग्रँड टूर २०२६ च्या माध्यमातून भारतासाठी आंतरराष्ट्रीय रोड सायकलिंगमध्ये एक मजबूत सुरुवात करणे, हे आमचे उद्दिष्ट आहे.

# समाजसेवक नानजीभाई ठक्कर ह्यांच्या उपस्थितीत स्वयंरोजगार मेळावा व साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन!

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रीय मोदी सेवा समिती (RMSS), विश्वधर्म अपंग मानव सेवा समिती, आर्या बहुउद्देशीय सेवा संस्था व जनमैत्रिय फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ ते ६ वाजता स्वयंरोजगार मेळावा व साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम एन. के. टी. बॅन्क्वेट हॉल, एन. के. टी. कॉलेज, ठाणे (प.) येथे संपन्न होणार असून समाजातील अपंग, गरजू व बेरोजगार घटकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) हे असणार



आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून विकासजी यदुवंशी (हिंदू शेर – राष्ट्रीय अध्यक्ष, RMSS) उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमास स्वातंत्र्यसैनिक श्री. महेंद्रजी त्रिवेदी (गुरुजी), श्री. बालाजी ना. सुर्यवंशी (राष्ट्रीय महामंत्री), सौ. वंदना वाघचौरे (अध्यक्षा, आर्या बहुउद्देशीय सेवा संस्था), मा. श्री. ज्ञानेश्वर ताथडे, डॉ. विनय गोविलकर (राष्ट्रीय मंत्री), दिनेशभाई हिंमतभाई ठक्कर (मालाड), श्री. राहुल अशोक म्हसदे (सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक, कृषी विभाग महाराष्ट्र शासन), श्री. किशोर लस्खन (प्रदेश अध्यक्ष – महाराष्ट्र), श्री. फिरोजभाई आर. पटेल (सामाजिक कार्यकर्ते, मालाड), श्री. विजय कुमार शेंडगे (शासकीय अधिकारी), डॉ. विश्वासराव आरोटे, ह.भ.प.चंद्रकांत महाराज डुंबरे, सौ. माधवीबेन चावडा (समाजसेविका), श्री. राजाभाऊ साहेब यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमात लाभार्थ्यांना विविध साहित्याचे वाटप करण्यात येणार असून स्वयंरोजगाराबाबत मार्गदर्शन व माहिती दिली जाणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिने अभिनेत्री व नृत्य दिग्दर्शिका शीतल चौगुले करणार आहेत.

तरी नागरिकांनी, लाभार्थ्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजक स्वातंत्र्यसैनिक मा. श्री. प्रकाश भारती (अध्यक्ष), विकास मगदूम (सचिव), गीता चव्हाण, सुप्रिया मून व सहकाऱ्यांनी केले आहे.

# डेकॅथलॉनच्या 'स्पोर्ट्स फॉर ऑल' मिशनला पाठबळ

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

डेकॅथलॉन इंडियाने जगातील सर्वात मोठे स्पोर्ट्स कम्युनिटी प्लॅटफॉर्म असलेल्या प्लेयोसोबत एक धोरणात्मक भागीदारी केली आहे. देशभरातील क्रीडाप्रेमींना अधिक सुलभता, विश्वास आणि सोयी उपलब्ध करून देणे हा या भागीदारीचा उद्देश आहे. स्पोर्ट्स फॉर ऑल या विश्वासावर आधारित असलेली ही भागीदारी ग्राहकांना शोधणे, बुक करणे आणि खेळण्यात सहभागी होणे अधिक सोपे करते.५ दशलक्ष हून अधिक प्लेयो वापरकर्त्यांपर्यंत पोहचून, या भागीदारीद्वारे डेकॅथलॉन तर्फे प्लेग्राउंड्सची ओळख अधिक प्रेक्षकांपर्यंत करून देण्याचा, प्ले-अँड-शॉप इकोसिस्टम अधिक मजबूत करण्याचा आणि संपूर्ण भारतभर दैनंदिन जीवनात खेळाचा सहभाग वाढवण्याचा प्रयत्न केला.

# २७ डिसेंबर रोजी 'धडक २' चित्रपटाचा प्रीमियर

**मुंबई: (समर्थ गांवकरी)**

झी सिनेमा वाहिनीवर 'धडक 2' या चित्रपटाचा जागतिक टेलिव्हिजन प्रीमियर होणार आहे. हा चित्रपट भावनांनी भरलेला, ताकदवान पात्रांनी सजलेला आणि तगड्या संघर्षांनी युक्त आहे. प्रगल्भता, नैसर्गिकता आणि प्रभाव दिसून येणाऱ्या या चित्रपटात तृप्ती डिमरी आणि सिद्धांत चतुर्वेदी यांच्या दमदार भूमिका आहेत. सहाय्यक कलाकार आणि वास्तवदर्शी वातावरणामुळे 'धडक 2' हा चित्रपट उत्कट कथा आणि तीव्र नाट्य आवडणाऱ्या प्रेक्षकांसाठी नक्कीच पाहण्यासारखा आहे. 'धडक 2' चित्रपटाचा जागतिक प्रीमियर फक्त झी सिनेमा वाहिनीवर, शनिवार, 27 डिसेंबर रोजी रात्री 9 वाजता पाहायला विसरू नका.

सिद्धांत चतुर्वेदी म्हणाला, "'धडक 2' हा चित्रपट खूप तीव्र आणि प्रामाणिक भावनिक




वातावरणात घडतो. नीलेशची भूमिका करताना मला अशा क्षणांचा शोध घ्यावा लागला जिथे तो सतत आपल्या मर्यादेला पुढे ढकलतो आणि ही भूमिका साकारण्याचा अनुभव अगदी खरा आणि जिवंत वाटला. या चित्रपटाकडे मला आकर्षित करणारी गोष्ट म्हणजे लेखनाची ताकद — प्रत्येक पात्र, मोठे असो वा छोटे, कथेला अर्थ आणि वजन देते. नीलेशला प्रेक्षकांकडून मिळालेलं प्रेम आणि सहानुभूती खूप विनम्र करणारी गोष्ट आहे आणि त्यामुळे हा संबंध या प्रवासाला अधिक खास बनवतो. आता झी सिनेमावरील वर्ल्ड टीव्ही प्रीमियरमुळे हा चित्रपट अधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल आणि घराघरांतील प्रेक्षकांसोबत जोडला जाईल याचा मला आनंद आहे."

दिग्दर्शिका शाझिया इक्बाल म्हणतात, "'धडक 2' या चित्रपटात त्रुटी असलेली, धाडसी आणि वास्तविक वाटतील अशी पात्रे आहेत. या कथेत संघर्ष, निवडी आणि भावनिक वादळे आहेत, जेव्हा आयुष्य अपेक्षेप्रमाणे चालत नाही तेव्हा लोकांना काय वाटते हे दाखवले आहे. तृप्ती आणि सिद्धांत यांनी त्यांच्या भूमिकांमध्ये प्रामाणिकपणा आणला आणि सहाय्यक कलाकारांनी चित्रपटातील जग वास्तवदर्शी आणि जिवंत बनवले. झी सिनेमा या चित्रपटाला मोठ्या प्रमाणात प्रेक्षकांपर्यंत पोहोचवत आहे याबद्दल मी त्यांची आभारी आहे. प्रेक्षकांना यात प्रत्येक क्षणातील वजन, तीव्रता आणि सत्यता नक्कीच जाणवेल अशी मला आशा आहे."

# वाढदिवसाचे औचित्य साधून डॉ. विश्वासराव आरोटे यांचा विद्यार्थ्यांसाठी मायेचा हात

## मुक्ताईची वाडी शाळेत स्वेटर, शालेय साहित्य व खाऊचे वाटप : शिवाजी मामा नाईकवाडी व शुभम गायकर यांच्या वाढदिवसानिमित्ताने उपक्रम!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मुक्ताईची वाडी या आदर्श शाळेत सामाजिक जाणिवेचे दर्शन घडविणारा स्तुत्य उपक्रम पार पडला. शिवाजी मामा नाईकवाडी व शुभम गायकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांसाठी थंडीपासून संरक्षण देणारे स्वेटर, शालेय साहित्य तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम २४ डिसेंबर रोजी उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात संपन्न झाला.

या उपक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ.





विश्वासराव आरोटे यांच्या पुढाकारातून करण्यात आले. थंडीच्या दिवसांत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उबदार कपड्यांची गरज ओळखून त्यांनी ही मदत केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. स्वेटर, शालेय साहित्य हातात पडताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद व समाधान पाहून उपस्थितांचे मन भारावून गेले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आदर्श शिक्षक बाळासाहेब आरोटे, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अकोले तालुका संपर्कप्रमुख तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे वृत्त संपादक संजय गायकर, सौ. दिपाली गायकर, सौ. प्रियंका फलके, शुभम गायकर आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी शाळेच्या उपक्रमशील वाटचालीचे कौतुक केले.

डॉ. विश्वासराव आरोटे यांनी आपल्या भाषणात मुक्ताईची वाडी शाळेतील स्वच्छता, टापटीप व्यवस्था, शैक्षणिक गुणवत्ता व नावीन्यपूर्ण उपक्रमांचे विशेष कौतुक केले. प्रत्येक विद्यार्थ्याने लावलेले झाड, परसबाग, कुंड्यांवर विद्यार्थ्यांची नावे, शेतीविषयक ज्ञानाची सांगड घालणारे उपक्रम, सुविचारांचे फलक आणि शिस्तबद्ध वातावरण यामुळे ही शाळा इतरांसाठी आदर्श ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

"शाळा ही केवळ पुस्तकी शिक्षणापुरती मर्यादित नसून, जीवनमूल्ये, संस्कार व समाजभान घडविण्याचे केंद्र आहे," असे त्यांनी ठामपणे सांगितले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. आरोटे म्हणाले, "आज तुम्ही इथे शिकत आहात; उद्या कोणी डॉक्टर, अभियंता, अधिकारी, उत्कृष्ट शेतकरी किंवा व्यापारी व्हाल. मात्र ज्या शाळेने तुम्हाला घडवले, त्या शाळेसाठी आयुष्यात काहीतरी देणे हे तुमचे कर्तव्य आहे."

तसेच त्यांनी दानधर्माची संकल्पना स्पष्ट करताना सांगितले की, "आपण कमावलेल्या उत्पन्नातील काही भाग आपल्या शाळेसाठी खर्च केला, तर त्याचा लाभ पुढील पिढीला होतो."

कार्यक्रमात त्यांनी शाळेतील शिक्षकांना उद्देशून सांगितले की, दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी दप्तर, वही, पेन, कम्पास, टिपिंग बॉक्स आदींचा समावेश असलेले शालेय किट देण्यात येईल. यासाठी शाळेने लेखी मागणी करावी, अशी सूचनाही त्यांनी दिली. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मोठा आधार मिळणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना हरिपाठ देण्यात आला. "घरात हरिपाठ वाचनाची सवय लागावी, संस्कार जपले जावेत," असा संदेश देत त्यांनी विद्यार्थ्यांना हे वाचन नियमित करण्याचे आवाहन केले. तसेच वाढदिवस साजरा करताना केवळ केक व दिखाव्यापेक्षा समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

### सामाजिक बांधिलकीचा आदर्श

डॉ. विश्वासराव आरोटे हे वर्षभर गरीब व गरजू नागरिकांसाठी स्वेटर, साडी, ब्लँकेट, किराणा वस्तू यांचे वाटप करत सामाजिक कार्यात सक्रिय असतात. मुक्ताईची वाडी शाळेतील हा उपक्रमही त्यांच्या सामाजिक जाणिवेचा भाग ठरला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य, शिक्षकांचा आत्मविश्वास आणि पालकांचा समाधानकारक प्रतिसाद यामुळे हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.